# विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय

## रोजगार हमी योजना शाखा

कोकण भवन, २ रा मजला, कक्ष क्र.२२५ सी.बी.डी.बेलापुर नवी मुंबई ४००६१४, दुरध्वनी /फॅक्स क्र .७५७१६४३
ई - मेल-egsdc.kokan-mh@gov.in

<u>बैठकीची सुचना</u>

क्रमांक- रोहयो/कार्या-५/वृक्ष लागवड/बैठक/४३५/१८
दिनांक - ०२.०४.२०१८.

प्रति,

१) जिल्हाधिकारी मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग
२) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग
३) आयुक्त, महानगरपालिका मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मिरा भाईंदर, भिवंडी, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, वसई विरार शहर, पनवेल.
४) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे / कोल्हापूर
५) उप जिल्हाधिकारी (रोहयो) ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग
६) उप जिल्हाधिकारी (सामान्य) मुंबई शहर, मुंबई उपनगर

विषय- सन २०१८ मधील १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पुर्वतयारी, आव्हाने व उपाययोजना इत्यादींबाबत विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी हयांचे समवेत सचिव (वने) हयांचे अध्यक्षतेखाली आयोजित बैठक दिनांक-०५ एप्रिल, २०१८.

संदर्भ- १) सह सचिव (वने), महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र.सावंवि-२०१७/प्र.क्र. १३८/फ-११, दिनांक- २७ फेब्रुवारी, २०१८ व दिनांक-०८ मार्च, २०१८
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक-रोहयो/कार्या-५/वृक्ष लागवड/बैठक/३७९/१८, दिनांक- १७ मार्च, २०१८
३) सह सचिव (वने), महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र.सावंवि-२०१७/प्र.क्र. १३८/फ-११, दिनांक- १९ मार्च, २०१८

उपरोक्त शासन संदर्भिय विषयान्वये सन २०१८ मधील १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पुर्वतयारी, आव्हाने व उपाययोजना इत्यादींबाबत मा. सचिव (वने) हयांचे अध्यक्षतेखाली दिनांक- ५ एप्रिल २०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता विभागीय आयुक्त कोंकण विभाग कार्यालय, समिती सभागृह पहिला मजला, बेलापूर, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

शासन संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने प्रस्तावित १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य दिशेने व्हावी, यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागाने संकलित करावयाच्या माहितीची प्रपत्रे शासन पत्र दिनांक-२७ फेब्रुवारी, २०१८ व दिनांक-०८ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रानुसार यापुर्वीच आपणास पाठविण्यात आले आहेत.

... राज्य, मुंबई
नोंदणी क्र. १२५११
दिनांक ०४/०४/२०१८
कार्यासन क्र. ५६

अद्यापर्यंत प्राप्त झालेली नाहीत तरी विहीत नमुन्यातील सर्व परिशिष्टांची माहिती दिनांक- २ एप्रिल, २०१८ रोजी कार्यालयीन वळेपुर्वी या कार्यालयास सादर करण्याची आपण व्यक्तिशः दक्षता घ्यावी. सर्व अधिकारी व प्रादेशिक विभागाचे अधिकारी व्यक्तिशः उपस्थित राहातील असे शासन निर्देश आहेत.

(मा. विभागीय आयुक्त यांचे निर्देशाने)

(अशोक पाटील)
उपआयुक्त (रोहयो), कोंकण विभाग

प्रत- खालील नमूद विभागीय अधिकाऱ्यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील वृक्ष लागवडीच्या पुर्वतयारीच्या दृष्टीने सदर बैठकीसाठी उपस्थित राहण्यासाठी विनंती आहे.

१. अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे
२. मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, मुंबई
३. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, मुंबई
४. पोलीस उपमहानिर्देशक, कोंकण विभाग, नवी मुंबई
५. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
६. विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे
७. उपआयुक्त विकास, कोंकण विभाग, कोंकण भवन
८. उपआयुक्त महसूल, कोंकण विभाग, कोंकण भवन
९. सहनिबंधक, सहकार, कोंकण विभाग
१०. उपसंचालक, शालेय शिक्षण, कोंकण विभाग
११. उपसंचालक, माध्यमिक शिक्षण, कोंकण विभाग
१२. प्रादेशिक उपआयुक्त, सामाजिक न्याय, कोंकण विभाग
१३. उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य, कोंकण विभाग
१४. अधीक्षक अभियंता, जलसंधारण मंडळ, ठाणे
१५. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण, कोंकण विभाग, नवी मुंबई
१६. उपसंचालक, पशु संवर्धन, कोंकण विभाग, नवी मुंबई
१७. प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, कोंकण विभाग
१८. मुख्य अभियंता, महावितरण, कल्याण
१९. सह संचालक, उच्च तंत्रशिक्षण विभाग, मुंबई, कोंकण विभाग
२०. मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोंकण भवन
२१. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग, मुंबई
२२. कार्यकारी संचालक, कोंकण जलसंपदा विकास महामंडळ, जलसंपदा विभाग
२३. उपविभागीय आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क)
२४. प्रादेशिक परिवहन अधिकारी RTO
२५. सहसंचालक, उद्योग विभाग
२६. सहसंचालक, पर्यटन व सांस्कृतिक विभाग
२७. अधीक्षक अभियंता, महा.राज्य विद्युत निर्मिती, उर्जा विभाग
२८. अधीक्षक अभियंता, महा.राज्य विद्युत वितरण, उर्जा विभाग
२९. अधीक्षक अभियंता, महा.राज्य विद्युत पारेषण, उर्जा विभाग
३०. सह संचालक, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
३१. उपआयुक्त कामगार विभाग
३२. उप आयुक्त, महिला व बालविकास विभाग
३३. अधीक्षक अभियंता, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
३४. सह संचालक, लेखा व कोषागारे
३५. गृह निर्माण विभाग
३६. प्रादेशिक उपसंचालक, नगरपालीका शाखा, कोंकण विभाग

सदर आढावा बैठकीमध्ये शासनाने निश्चित केलेल्या व आपणास सादरीकरण करावया

स्लाईड निहायचा तपशिल खालील प्रमाणे -

| अ.क्र. | सादरीकरण करणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम | सादरीकरणाचा तपशिल | शासनाने दिलेल स्लाईड |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | संपूर्ण जिल्हयातील विविध प्रशासकीय विभागांची माहिती विषयक सादरीकरण | परिशिष्ट १ मधिल तसेच स्लाईड क्र. (दि. ८ मार्च, २०१८ |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | १) ग्रामपंचायतीच्या जिल्हानिहाय लॅंड बॅंकबाबत चे सादरीकरण.<br>२) शासनाने सुचित केल्यानुसार मु. पो. रानमाळा, ता. खेड, जि. पुणे या धर्तीवर आपल्या जिल्हयात ग्रामीण भागात सदर योजना कशाप्रकारे राबविण्यात येईल याचे सादरीकरण. | १) परिशिष्ट १ मधि २ नुसार. (दि. ८ मा पत्रानुसार)<br>२) शासन निर्णय दि व दि. १६ मार्च २० |
| ३ | आयुक्त, महानगरपालीका | १) महानगरपालिका क्षेत्रातील लॅंड बॅंकबाबतचे सादरीकरण.<br>२) शासनाने सुचित केल्यानुसार मु. पो. रानमाळा, ता. खेड, जि. पुणे या धर्तीवर आपल्या महानगरपालीका क्षेत्रात /नागरी भागात सदर योजना कशाप्रकारे राबविण्यात येईल याचे सादरीकरण. (शासन निर्णय दि. १ मार्च २०१८ व दि. १६ मार्च २०१८ नुसार) | १) परिशिष्ट-१ मध ३ नुसार. (दि. ८ पत्रानुसार)<br>२) शासन निर्णय दि व दि. १६ मार्च २० |

त्याचप्रमाणे सदर सभेसाठी आपल्या जिल्हयातील सामाजिक वनीकरण विभागाचे विभागाचे सर्व उपवन संरक्षक व महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे अधिकारी यांनाही सदर बैठकी राहण्याच्या सुचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात.

सदर आढावा बैठकीमध्ये मा. विभागीय आयुक्त यांनी प्रादेशिक विभागांतर्गत एक कार्यक्रमाचे नियोजन आणि तयारी बाबत विविध प्रशासकीय विभागांची माहिती विचारात घेऊन सादरी आहे. त्यामुळे शासन पत्र दिनांक-०८ मार्च, २०१८ मधिल सादरीकरण नमुना परिशिष्ट -२ मधील स्लाई

सादर करणेबाबत उक्त संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले होते. परंतु सदर माहिती

**महाराष्ट्र शासन**

अत्यंत तातडीचे
बैठकीची सूचना

क्र.:-सावनि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ०८ मार्च, २०१८.

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व).
२. जिल्हाधिकारी (सर्व).
३. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
५. प्रशासकीय विभागांचे प्रादेशिक प्रमुख / विभाग प्रमुख (सर्व).

विषय:- सन २०१८ मधील १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पूर्वतयारी, आव्हाने व उपाययोजना इत्यादींबाबत विभागीय आयुक्त (महसूल), जिल्हाधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांसमवेत सचिव (वने) ह्यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठका.

संदर्भ:- शासन समक्रमांकाचे पत्र दि.२७ फेब्रुवारी, २०१८.

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे. त्या अनुषंगाने सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयात होणाऱ्या बैठकांचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील:-

| अ. क्र. | महसूल विभागाचे नाव | बैठकीचा दिनांक, वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | नाशिक | बुधवार, दि.०४ एप्रिल, २०१८, वेळ - सकाळी १०.०० वा. | विभागीय आयुक्त (महसूल), नाशिक यांचे कार्यालय. |
| २ | कोकण | गुरूवार, दि. ०५ एप्रिल, २०१८ वेळ - सकाळी १०.०० वा. | विभागीय आयुक्त (महसूल), कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालय. |
| ३ | औरंगाबाद | शनिवार, दि.०७ एप्रिल, २०१८ वेळ - सकाळी १०.०० वा. | विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद यांचे कार्यालय. |
| ४ | नागपूर | बुधवार, दि. ११ एप्रिल, २०१८ वेळ - सकाळी १०.०० वा. | विभागीय आयुक्त (महसूल), नागपूर यांचे कार्यालय. |
| ५ | अमरावती | गुरूवार, दि. १२ एप्रिल, २०१८ वेळ - सकाळी १०.०० वा. | विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती यांचे कार्यालय. |
| ६ | पुणे | बुधवार, दि. २५ एप्रिल, २०१८ वेळ - सकाळी १०.०० वा. | विभागीय आयुक्त (महसूल), पुणे यांचे कार्यालय. |

(कृ.मा.प.)

सर्व विभागीय आयुक्त यांच्या समवेत होणाऱ्या बैठकांना त्या त्या प्रादेशिक विभागातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व आयुक्त, महानगरपालिका, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व प्रशासकीय विभागांचे प्रादेशिक प्रमुख / विभाग प्रमुख हे उपस्थित राहतील. **सदर बैठक अत्यंत महत्त्वाची असल्याने सर्व अधिकाऱ्यांनी या बैठकीस व्यक्तिश: उपस्थित रहावे आणि आपला प्रतिनिधी पाठवू नये, अशी शासन निर्देशानुसार विनंती आहे.**

वन विभागामार्फत ह्या बैठकीस प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन आणि व्यवस्थापन) व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी, नागपूर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), नागपूर, संबंधित प्रादेशिक विभागातील मुख्य वनसंरक्षक (प्रा.) वनवृत्तांसाठी नेमलेले पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि विशेष अधिकारी, सह सचिव संवर्ग, मंत्रालय हे उपस्थित राहतील.

त्याचबरोबर वन विभागांतर्गत त्या त्या प्रादेशिक विभागातील सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रा.), वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, सर्व उप वनसंरक्षक (प्रा.), सर्व विभागीय वन अधिकारी (प्रा.), सर्व विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण), विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ इत्यादी अधिकारी बैठकीत सहभागी होतील.

**प्रस्तावित १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य दिशेने व्हावी, यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागाने संकलित करावयाच्या माहितीची प्रपत्रे संदर्भाधीन दिनांक २७.०२.२०१८ रोजीच्या पत्रानुसार यापूर्वी देण्यात आली आहेत. दिनांक २७.०२.२०१८ रोजीच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी सर्व प्रशासकीय विभागाच्या जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांच्या बैठका दिनांक ३१.०३.२०१८ पुर्वी घेऊन वर नमूद प्रपत्रात माहिती संकलित करून त्याची पुस्तिका बैठकीपूर्वी कृपया तयार ठेवावी ही विनंती.**

जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण जिल्ह्यातील विविध प्रशासकीय विभागांच्या माहितीसंदर्भात कृपया सादरीकरण करावयाचे आहे. सादरीकरणाचा नमुना **परिशिष्ट-१ प्रमाणे सोबत जोडला आहे (अ.क्र. १ ते १३ स्लाईड- स्लाईड क्र.२ आणि ३ वगळून).** त्यानुसार संबधित जिल्हाधिकारी यांनी कृपया सादरीकरण करावे. सन २०१८ मध्ये ग्रामपंचायतीसाठी वृक्ष लागवडीकरिता स्वतंत्र उदिष्ठ दिले असल्याने ग्रामपंचायतींच्या जिल्हानिहाय लँड बँक बाबत **परिशिष्ठ- १ मधील स्लाईड क्र.२** मध्ये संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादरीकरण करावे अशी विनंती आहे.

सन २०१८ मध्ये महानगरपालिकांसाठी वृक्ष लागवडीकरिता बराच वाव आहे. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील लँड बँक बाबत **परिशिष्ठ- १ मधील स्लाईड क्र. ३** मध्ये संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त यांनी सादरीकरण करावे अशी विनंती आहे.

त्याचप्रमाणे संबंधित विभागीय आयुक्त यांनी प्रादेशिक विभागांतर्गत एकंदरीत वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन आणि तयारीबाबत विविध प्रशासकीय विभागांची माहिती विचारात घेऊन कृपया सादरीकरण करावे. सादरीकरणाचा नमुना **परिशिष्ट-२ प्रमाणे सोबत जोडला आहे. (अ.क्र. १ ते ४ स्लाईड)**

तरी, वरीलप्रमाणे सर्व संबंधित प्रादेशिक विभाग प्रमुख / विभाग प्रमुख यांना वरील वेळापत्रकानुसार बैठकांना व्यक्तीश: उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावर देखील तातडीने कळवावे, अशी विनंती आहे.

आपला,

(अतुल कोदे)
**सह सचिव (वने)**
**महसूल व वन विभाग**

**सोबत:- परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२.**

प्रत माहितीसाठी:-

१) मा. मुख्य सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३) मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांचे खाजगी सचिव.
४) मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.

प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी :-

१) सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
२) सर्व प्रशासकीय विभागांचे सह सचिव / उप सचिव संवर्गातील समन्वय अधिकारी.

वरील अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की संदर्भाधिन दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रात विनंती केल्यानुसार आणि संबंधित प्रशासकीय विभागांना दिलेल्या विहीत प्रपत्रात माहिती त्या त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना बैठकीपूर्वी देण्याबाबत शासन स्तरावरुन कृपया निर्देश देण्यात यावेत.

प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी सर्व प्रशासकीय विभागांचे प्रादेशिक प्रमुख :-

१) विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व), गृह विभाग.
२) जिल्हा पोलीस आयुक्त, गृह विभाग (जिथे संबंधित असेल तिथे)
३) पोलीस उपमहानिरिक्षक (कारागृह) पुणे, औरंगाबाद,नाशिक,नागपूर/अमरावती आणि विशेष पोलीस महानिरिक्षक (कारागृह), मुंबई, कोकण विभाग, गृह (कारागृहे विभाग).
४) प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व), गृह (परिवहन विभाग).
५) उप विभागीय आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क) (सर्व), गृह (राज्य उत्पादन शुल्क विभाग).
६) कार्यकारी संचालक, सिंचन महामंडळे (सर्व), जलसंपदा विभाग.
७) विभागीय सह संचालक (कृषी) (सर्व). कृषी विभाग.
८) मुख्य अभियंता (प्रा.) (सर्व), सार्वजनिक बांधकाम विभाग.
९) विभागीय सह निबंधक (सर्व). सहकार विभाग.
१०) सह संचालक (पणन), संचालक (पणन) यांचे कार्यालय, पुणे, सहकार व पणन विभाग.
११) सह संचालक (उद्योग) (सर्व), उद्योग विभाग.
१२) उप संचालक (शिक्षण) (सर्व), शालेय शिक्षण विभाग.
१३) सह संचालक (उच्च शिक्षण) (सर्व), उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
१४) सह संचालक (तंत्र शिक्षण ) (सर्व), उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
१५) अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर (संबंधित अतिरिक्त आयुक्त पुणे व औरंगाबाद येथील कार्यभारासह) आदिवासी विकास विभाग.
१६) प्रादेशिक उपायुक्त (सर्व), सामाजिक न्याय विभाग.
१७) सह संचालक (सांस्कृतिक), सांस्कृतिक कार्य संचालनालय कार्यालय, पर्यटन व सांस्कृतिक विभाग.
१८) सह संचालक (पर्यटन), महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ कार्यालय, पर्यटन व सांस्कृतिक विभाग.
१९) उप संचालक (आरोग्य) (सर्व), सावर्जनिक आरोग्य विभाग.
२०) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (सर्व), उर्जा विभाग.
२१) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (सर्व), उर्जा विभाग.
२२) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (सर्व), उर्जा विभाग.
२३) सह संचालक (वैद्यकीय शिक्षण), संचालक वैद्यकीय शिक्षण कार्यालय, मुंबई, वैद्यकीय शिक्षण विभाग.
२४) उप आयुक्त (कामगार) (सर्व), कामगार विभाग.
२५) अधिक्षक अभियंता (स्थानिक स्तर) (सर्व),जलसंधारण विभाग.
२६) सह संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण ) (सर्व), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग.
२७) उप आयुक्त (महिला बाल विकास विभाग) (सर्व), महिला व बालविकास विभाग.
२८) अधिक्षक अभियंता (पाणीपुरवठा) (सर्व), पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.
२९) सह आयुक्त (पदुम) (सर्व), पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स विभाग.
३०) सह संचालक (लेखा व कोषागरे) (सर्व), लेखा व कोषागरे संचालनालय, वित्त विभाग.
३१) गृह निर्माण विभागांतर्गत प्रादेशिक स्तरावरील गृह निर्माण मंडळाचे प्रमुख.
३२) केंद्रीय संरक्षण विभागांतर्गत संबंधित अधिकारी.
३३) केंद्र शासनांतर्गत वेस्टन कोल फिल्डचे संबंधित अधिकारी (जिथे संबंधित आहे तिथे).
३४) केंद्र शासनांतर्गत इतर कार्यालयांशी संबंधित अधिकारी.

उपरोक्त नमूद प्रादेशिक स्तरावरील अधिकाऱ्यांनी आवश्यक माहितीसह बैठकीस उपस्थित राहावे अशी विनंती आहे.

प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी:-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर.
२) महाव्यवस्थापक, महाराष्ट वन विकास महामंडळ, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन आणि व्यवस्थापन), नागपूर.
व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे.
५) सर्व पालक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
७) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) (सर्व).
८) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ (सर्व).

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी:-

१) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण (सर्व).
२) उप वनसंरक्षक (प्रा.) (सर्व).
३) सर्व विभागीय वन अधिकारी (प्रा.) (सर्व).
४) विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) (सर्व).
५) विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ (सर्व).

वरील सर्व अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, आवश्यक माहितीसह आपण या बैठकीस व्यक्तिशः उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

प्रत माहितीसाठी :-

१) आयुक्त (कृषी)
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ.
३) संचालक (सार्वजनिक आरोग्य), सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
३) संचालक (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण विभाग.
४) संचालक (सांस्कृतिक कार्य) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.

परिशिष्ट-१

(१) जिल्हानिहाय विविध विभागांसाठी सन २०१८ मधील १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत उद्दिष्ट.

| अ.क्र. | वर्ष | जिल्ह्याचे नाव | वन विभाग | सामाजिक वनीकरण | एफडीसीएम | ग्रामपंचायत | प्रत्येक प्रशासकीय विभागनिहाय | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | | | ९ |
| १ | २०१८ | | | | | | कृषि | नगरविकास | जलसंपदा | इत्यादी | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | एकूण | | | | | | | | | |

## (२) जिल्हानिहाय ग्रामपंचायतीसाठी लॅन्ड बँक

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | ग्रामपंचायतीचे नाव | वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध आणि योग्य एकंदर क्षेत्र (किमी/हे.) | | | | सन २०१८ मध्ये वृक्ष लागवडीसाठी प्रस्तावित क्षेत्र (किमी/हे.) | | | | वृक्षांची एकंदर संख्या (प्रती हेक्टर १००० किंवा जागेवर लागवडीसाठी अंदाजित वृक्ष संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | | | ५ | | | | ६ |
| | | | सलग लांबीतील क्षेत्र (किमी) | गट लागवड (हे.) | पाझर तलाव / लघु पाटबंधारे परिसर / स्मशानभुमी आणि इतर जागा | गावठणांतर्गत खाजगी मालकीच्या घरांचा परिसर (रोपांची संख्या) | सलग लांबीतील क्षेत्र (किमी) | गट लागवड (हे.) | पाझर तलाव | गावठणांतर्गत खाजगी मालकीच्या घरांचा परिसर. (रोपांची संख्या) | |
| | | | १ | २ | ३ | ४ | १ | २ | ३ | ४ | |
| १ | | १ | | | | | | | | | |
| | | २ | | | | | | | | | |
| | | ३ | | | | | | | | | |
| | | ४ | | | | | | | | | |
| | | इत्यादी | | | | | | | | | |
| २ | | १ | | | | | | | | | |
| | | २ | | | | | | | | | |
| | | ३ | | | | | | | | | |
| | | इत्यादी | | | | | | | | | |
| | | | एकूण | | | | | | | | |

परिशिष्ठ-२

(१) प्रादेशिकस्तरावरील जिल्हानिहाय गोषवारा.

| अ. क्र. | जिल्हयाचे नाव | प्रशासकीय विभागाचे नाव केंद्र शासनाच्या कार्यालयांसह | एकूण उपलब्ध क्षेत्र ( हेक्टर/ वृक्ष संख्या ) (जिथे लागू असेल त्याप्रमाणे) | स्तंभ- ४ पैकी २०१८ मध्ये प्रस्तावित लागवडीसाठी क्षेत्र ( हेक्टर/वृक्ष संख्या ) (जिथे लागू असेल त्याप्रमाणे) | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती | निवडलेल्या वृक्षारोपण स्थळांच्या ठिकाणी दि. ३१.०३.२०१८ पर्यंत खड्डे तयार करण्याबाबत सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| | | | एकंदर | | | |

(२ ) प्रादेशिक स्तरावरील हरित सेना नोंदणी (शासन पत्र क्र. साववि-२०१७/ प्र.क्र.१३८/फ-११ दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना १ कोटी वैयक्तिक सदस्य नोंदणीचे दिलेले उद्दिष्ट.)

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | उद्दिष्ट | दि. ३१ मार्च २०१८ पर्यंत साध्य. | उर्वरित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नियोजन आणि कृती आराखडा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| | एकूण | | | |

(१२) जिल्हयातील २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन- २०१६ मध्ये लावलेल्या झाडांच्या जिवंत राहण्याची टक्केवारी.

| अ. क्र | प्रशासकीय विभागाचे नाव | २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेली एकूण झाडे (हजारात किंवा लाखात) | दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ किंवा सद्याच्या मोजणीप्रमाणे जिवंत झाडे आणि टक्केवारी. | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| | एकूण | | | |

(१३) जिल्हयातील ४ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत सन- २०१७ मध्ये लावलेल्या झाडांच्या जिवत राहण्याची टक्केवारी.

| अ. क्र | प्रशासकीय विभागाचे नाव | ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेली एकूण झाडे (हजारात किंवा लाखात) | दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ किंवा सद्याच्या मोजणीप्रमाणे जिवंत झाडे आणि टक्केवारी. | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| | एकूण | | | |

(७) हरित सेना नोंदणी (शासन पत्र क्र. सावनि-२०१७/ प्र.क्र.१३८/फ-११ दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना १ कोटी वैयक्तिक सदस्य नोंदणीचे दिलेले उद्दिष्ट.)

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | उद्दिष्ट | दि. ३१ मार्च २०१८ पर्यंत साध्य. | उर्वरित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नियोजन आणि कृती आराखडा |
|---|---|---|---|---|
| | | | ४ | ५ |
| १ | २ | ३ | | |
| १ | | | | |
| एकूण | | | | |

(८) प्रस्तावित १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमासाठी समाजातील विविध घटकांचा सामावून घेणे आणि मनुष्यबळ उपलब्धता उदा. खाजगी / अशासकीय संस्था / एनएसएस / एनसीसी / आध्यात्मिक संस्थांचे स्वयंसेवक / उद्योजक / मा.पालकमंत्री / मा. आमदार / मा. खासदार / महानगरपालिकांचे महापौर / महानगरपालीकांचे उप महापौर आणि नगरसेवक / जिल्हा परिषदांचे अध्यक्ष / उपाध्यक्ष आणि सदस्य, पंचायत समित्यांचे सभापती / उपसभापती आणि सदस्य / ग्रामपंचायतींचे सरपंच आणि सदस्य आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी इत्यादी. सदर माहिती संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांना योग्य राहिल त्यानुसार सादर करावी.

(९) वृक्षारोपण कार्यक्रमाची जिल्हानिहाय प्रसिध्दी आणि प्रसार विषयक कृती आराखडा आणि अंमलबजावणी.

(१०) जिल्ह्यातील विविध प्रशासकीय विभागांतर्गत समन्वय अधिकाऱ्यांची पुस्तिका तयार करणे.

(११) वृक्ष लागवड कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी नाविन्यपूर्ण योजना, कार्यक्रम आणि संकल्पना.

(६) जिल्ह्यातील वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट व त्यानुसार रोपवाटिका विकसन आणि रोपांची उपलब्धता.

| अ.क्र. | विभागाचे नाव | विविध कार्यक्रमांतर्गत निर्मित करावयाच्या रोपवाटिकांची संख्या व रोपवाटिका विकसनाची सद्य:स्थिती | गेल्या वर्षी शिल्लक असलेली रोपे | सन २०१८ मधील वृक्ष लागवडीसाठी सन २०१७-१८ मध्ये निर्माण करावयाच्या रोपांची संख्या व सद्य:स्थिती | सन २०१९ मधील वृक्ष लागवडीसाठी सन २०१७-१८ मध्ये निर्माण करावयाच्या रोपांची संख्या व सद्य:स्थिती | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | वन विभाग | | | | | |
| २ | सामाजिक वनीकरण | | | | | |
| ३ | एफडीसीएम | | | | | |
| ४ | कृषि | | | | | |
| ५ | नगर विकास विभाग | | | | | |
| ६ | जलसंपदा | | | | | |
| ७ | सार्वजनिक बांधकाम इत्यादी | | | | | |
| | एकूण | | | | | |

## (३) जिल्ह्यातील महानगरपालिकांसाठी वृक्ष लागवडीसाठी लॅन्ड बँक

| अ. क्र. | महानगरपालिकेचे नाव | वॉर्ड क्रमांक आणि नाव | वृक्ष लागवडीसाठी एकंदर उपलब्ध क्षेत्र (कि.मी./हे.) (रस्ते व मोकळ्या जागा) | स्तंभ ४ पैकी सन २०१८ मध्ये वृक्ष लागवडीसाठी प्रस्तावित क्षेत्र. | वृक्षांची एकंदर संख्या (प्रती हे. १००० आणि प्रती कि.मी. ५०० रोपे प्रमाणे). | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती | निवडलेल्या वृक्षारोपण स्थळांच्या ठिकाणी दि. ३१.०३.२०१८ पर्यंत खड्डे तयार करण्याबाबत सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १) | उदा. पुणे महानगरपालिका. | १) | | | | | |
| | | २) | | | | | |
| | | ३) इत्यादी | | | | | |
| | | एकंदर | | | | | |
| २) | महानगरपालिका क्षेत्रातील कार्यालयांचा परिसर (वृक्षांची संख्या द्यावी). | १) | | | | | |
| | | २) | | | | | |
| | | ३) इत्यादी | | | | | |
| ३) | महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक / माध्यमिक शाळांचा परिसर व खेळाची मैदानाच्या कडेला (वृक्षांची संख्या द्यावी). | | | | | | |
| | | एकूण | | | | | |

(४) जिल्हानिहाय लँण्ड बँक.

| अ. क्र. | प्रशासकीय विभागाचे नाव केंद्र शासनाच्या कार्यालयांसह | एकूण उपलब्ध क्षेत्र ( हेक्टर/ वृक्ष संख्या ) (जिथे लागू असेल त्याप्रमाणे) | स्तंभ- ३ पैकी २०१८ मध्ये प्रस्तावित लागवडीसाठी क्षेत्र ( हेक्टर/वृक्ष संख्या ) (जिथे लागू असेल त्याप्रमाणे) | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती | निवडलेल्या वृक्षारोपण स्थळांच्या ठिकाणी दि. ३१.०३.२०१८ पर्यंत खड्डे तयार करण्याबाबत सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| | | एकंदर | | | |

(५) जिल्हयातील नद्या / उप नद्यांच्या दोन्ही काठांपासून १ किमी रूंदीत सन २०१८ व २०१९ मध्ये वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध होणारे क्षेत्र (जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने निश्चित केलेल्या लँड बँकप्रमाणे)
(शासन पत्र क्र. सावनि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११ दि.०१ नोव्हेंबर, २०१७ नुसार)

| अ.क्र. | नदी / उप नदीचे नाव | जिल्ह्यातील लांबी | वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध आणि वृक्ष लागवडी योग्य क्षेत्र | | | | सन २०१८ मध्ये वृक्ष लागवडीसाठी प्रस्तावित केलेले क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | | | ५ | | |
| | | | वनक्षेत्र (हेक्टर) ४- अ | शासकीय जमीन (हेक्टर) ४-ब | खाजगी क्षेत्र (हेक्टर) ४-क | एकूण (हेक्टर) ४-ड | वनक्षेत्र (हेक्टर) ५-अ | शासकीय जमीन (हेक्टर) ५-ब | एकूण (हेक्टर) ५-क |
| | | | | | | | | | |
| १ | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | |
| इत्यादी | | | | | | | | | |

(३) प्रादेशिक स्तरावरील २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन- २०१६ मध्ये लावलेल्या झाडांच्या जिवत राहण्याची टक्केवारी.

| अ. क्र | जिल्हयाचे नाव | प्रशासकीय विभागाचे नाव केंद्र शासनाच्या कार्यालयांसह | २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेली एकूण झाडे (हजारात किंवा लाखात) | दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ किंवा सद्याच्या मोजणीप्रमाणे जिवंत झाडे आणि टक्केवारी. | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| | एकूण | | | | |

(४) प्रादेशिक स्तरावरील ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन- २०१७ मध्ये लावलेल्या झाडांच्या जिवत राहण्याची टक्केवारी.

| अ. क्र | जिल्हयाचे नाव | प्रशासकीय विभागाचे नाव, केंद्र शासनाच्या कार्यालयांसह | ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेली एकूण झाडे (हजारात किंवा लाखात) | दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ किंवा सद्याच्या मोजणीप्रमाणे जिवंत झाडे आणि टक्केवारी. | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| | | एकूण | | | |

# विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय

## रोजगार हमी योजना शाखा

कोंकण भवन, २ रा मजला,कक्ष क्र.२२५ सी.बी.डी.बेलापुर नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी क्र. २७५७१६४३ /फॅक्स क्र. २७५७१६४३/२७५७१५१६

रोहयो/तांत्रिक/टे-8/आढावा/ 658 /2017

दिनांक : 18.09.2017

प्रति,

1) जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
2) मुख्य वनसंरक्षक, ठाणे/कोल्हापूर
3) मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण, कोंकण विभाग, ठाणे
4) उप वनसंरक्षक तथा नोडल अधिकारी, ठाणे, डहाणू, रायगड, चिपळूण, सावंतवाडी
5) उप संचालक सामाजिक वनीकरण, ठाणे,रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग
6) उपजिल्हाधिकारी (रोहयो), ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
7) उपजिल्हाधिकारी (सामान्य), मुंबई शहर/मुंबई उपनगर
8) उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रा.पं., ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग

4
सहसंचालक, तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, मुंबई ५
आवक क्रमांक : 7087
दिनांक :
21 SEP 2017

विषय : सन 2018 च्या पावसाळयांत 50 कोटी वृक्ष लागवड अंतर्गत केलेल्या पूर्वतयारीबाबत आढावा सभा दि.21.09.2017 - मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली

संदर्भ : मुख्य वनसंरक्षक यांचे दि.08.09.2017 चे अ.शा. पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य स्तरावर सन 2017 ते सन 2019 या कालावधीत वन व वनेतर क्षेत्रावर करावयाची रोपे लागवड व त्याची जोपासना ही एक चळवळ व्हावी म्हणून शासन निर्णय दि.31.03.2016 व 10.10.2016 अन्वये राज्यात 50 कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यांत आलेले आहे.

त्या अनुषंगाने राज्यात सन 2017 च्या पावसाळयांत दि.1 ते 7 जुलै दरम्यान 4 कोटी वृक्ष लागवडीचे लक्षांक होते. त्याप्रमाणे कोंकण विभागांत सुध्दा सर्व यंत्रणांनी चांगली कामगिरी केलेली होती. त्यामुळे आपण उद्दिष्टापेक्षा जास्त रोपे लागवड करु शकलो. आता हया वर्षी आपली जबाबदारी अधिकच वाढली आहे. सन 2018 मध्ये 13 कोटी रोपे लागवडीचे उद्दिष्ट प्राप्त झालेले आहे ते सन 2017 च्या तुलनेत नक्कीच जास्त आहे. त्या अनुषंगाने मा.विभागीय आयुक्त, **कोंकण विभाग यांनी दि.21.09.2017 रोजी दुपारी 2.30 वाजता समिती सभागृह, पहिला मजला, कोंकण भवन, नवी मुंबई येथे सर्व यंत्रणांची आढावा बैठक आयोजित केली आहे.** त्यामध्ये प्रकर्षाने सन 2018 मधील पावसाळयातील रोपे लागवडीबाबतच्या पूर्वतयारीबाबत आढावा घेण्यांत येणार आहे. त्यात प्रामुख्याने खालील विषयांवर चर्चा करण्यांत येईल.

1) शासनाने निर्धारीत केलेनुसार सन 2018 साठीचे जिल्हानिहाय वनविभाग, ग्रामपंचायत विभाग व इतर विभाग यांचे ठरविण्यांत आलेले लक्षांक.

2) रोपे/झाडे लागवडीसाठी आवश्यक क्षेत्र निश्चित होणेसाठी लॅड बॅकची माहिती तयार करणे. त्यामध्ये प्रकर्षाने ग्रामपंचायत विभाग व इतर विभाग यांची माहिती तयार ठेवणे अत्यंत महत्वाचे असून वनविभागाची माहिती तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे वनेतर क्षेत्राची माहिती तयार असणे गरजेचे व क्रमप्राप्त आहे.

3) सन 2018 च्या पावसाळयांत लागणाऱ्या रोपांच्या निर्मितीसाठी वनविभागाने केलेले नियोजन व मनरेगा अंतर्गत रोपवाटीका स्थापनेसाठी पाठविण्यांत आलेले प्रस्ताव, प्रशासकीय मान्यताप्राप्त प्रस्ताव व अद्याप प्रशासकीय मान्यता बाकी असलेले प्रस्ताव अशी माहिती सोबत आणावी.

4) पूर्व तयारीच्या दृष्टीने सदर आढावा बैठकीत मुख्य वनसंरक्षक, ठाणे/कोल्हापूर हे देखील सूक्ष्म नियोजनाच्या दृष्टीने मार्गदर्शन करणार आहेत.

उप आयुक्त (रोहयो), कोंकण विभाग करीता

प्रत: खालील नमूद विभागीय अधिकाऱ्यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील वृक्ष लागवडीच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने सदर बैठकीसाठी उपस्थित रहाण्यासाठी विनंती आहे.

1. अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे
2. मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, मुंबई
3. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, मुंबई
4. पोलीस उपमहानिर्देशक, कोंकण विभाग, नवी मुंबई
5. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
6. आयुक्त, महानगरपालिका, नवी मुंबई
7. विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे
8. उपआयुक्त विकास, कोंकण विभाग, कोंकण भवन
9. उपआयुक्त महसूल, कोंकण विभाग, कोंकण भवन
10. सहनिबंधक, सहकार, कोंकण विभाग
11. उपसंचालक, शालेय शिक्षण, कोंकण विभाग
12. उपसंचालक, माध्यमिक शिक्षण, कोंकण विभाग
13. प्रादेशिक उपआयुक्त, सामाजिक न्याय, कोंकण विभाग
14. उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य, कोंकण विभाग
15. अधीक्षक अभियंता, जलसंधारण मंडळ, ठाणे
16. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण, कोंकण विभाग, नवी मुंबई
17. उपसंचालक, पशु संवर्धन, कोंकण विभाग, नवी मुंबई
18. प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, कोंकण विभाग
19. मुख्य अभियंता, महावितरण, कल्याण
20. सह संचालक, उच्च तंत्रशिक्षण विभाग, मुंबई, कोंकण विभाग
21. मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोंकण भवन

# विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांचे कार्यालय

## रोजगार हमी योजना शाखा

कोंकणभवन,२रामजला,कक्षक्र.२२५सी.बी.डी.बेलापुरनवीमुंबई४००६१४,दुरध्वनीक्र.२७५७१६४३/फॅक्सक्र.२७५७१६४३/२७५७१५१६

क्र. रोहयो/टे-५/वृक्ष लागवड/आढावा//२०१७
दिनांक : .०९.२०१७

प्रति,

१) जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
२) मुख्य वनसंरक्षक, ठाणे/कोल्हापूर
३) मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण, कोंकण विभाग, ठाणे
४) उप वनसंरक्षक तथा नोडल अधिकारी, ठाणे, डहाणू, रायगड, चिपळूण, सावंतवाडी
५) उप संचालक सामाजिक वनीकरण, ठाणे,रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग
६) उपजिल्हाधिकारी (रोहयो), ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग
७) उपजिल्हाधिकारी(सामान्य), मुंबई शहर/मुंबई उपनगर
८) उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रा.पं., ठाणे/पालघर/रायगड/रत्नागरी/सिंधुदूर्ग

संचालक, वनीकरण
...कार्यालय, मुंबई ५१.
...क्रमांक : 7366
दिनांक : 29 SEP 2017

विषय : सन २०१८ च्या पावसाळयांत ५० कोटी वृक्ष लागवड अंतर्गत केलेल्या पूर्वतयारीबाबत आढावा सभा दि.०६.१०.२०१७ - मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली

संदर्भ : १) मुख्य वनसंरक्षक यांचे दि.०८.०९.२०१७ चे अ.शा. पत्र
२) या कार्यालयाचे पत्र क्र. रोहयो/तांत्रिक/टे-८/आढावा/६५८/२०१७ दि. १८.०९.२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य स्तरावर सन २०१७ ते सन २०१९ या कालावधीत वन व वनेतर क्षेत्रावर करावयाची रोपे लागवड व त्याची जोपासना ही एक चळवळ व्हावी म्हणून शासन निर्णय दि.३१.०३.२०१६ व १०.१०.२०१६ अन्वये राज्यात ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यांत आलेले आहे.

त्या अनुषंगाने राज्यात सन २०१७ च्या पावसाळयांत दि.१ ते ७ जुलै दरम्यान ४ कोटी वृक्ष लागवडीचे लक्षांक होते. त्याप्रमाणे कोंकण विभागांत सुध्दा सर्व यंत्रणांनी चांगली कामगिरी केलेली होती. त्यामुळे आपण उद्दिष्टापेक्षा जास्त रोपे लागवड करु शकलो. आता हया वर्षी आपली जबाबदारी अधिकच वाढली आहे. सन २०१८ मध्ये १३ कोटी रोपे लागवडीचे उद्दिष्ट प्राप्त झालेले आहे ते सन २०१७ च्या तुलनेत नक्कीच जास्त आहे. त्या अनुषंगाने यापुर्वी उक्त संदर्भि क्र. २ अन्वये कळविणेत आलेले होते परंतू काही अपरिहार्य कारणांमूळे सदर बैठक रद्द करण्यात आल्याची आपणास अवगत करण्यात आलेले होते तरी सदर विषयांकित बैठक आता मा.विभागीय आयुक्त,कोंकण विभाग यांनी दि.०६.१०.२०१७ रोजी दुपारी २.३० वाजता समिती सभागृह, पहिला मजला, कोंकण भवन, नवी मुंबई येथे सर्व यंत्रणांची आढावा बैठक आयोजित केली आहे. त्यामध्ये प्रकर्षाने सन २०१८ मधील पावसाळयातील रोपे लागवडीबाबतच्या पूर्वतयारीबाबत आढावा घेण्यांत येणार आहे. त्यात प्रामुख्याने खालील विषयांवर चर्चा करण्यांत येईल.

१) शासनाने निर्धारीत केलेनुसार सन २०१८ साठीचे जिल्हानिहाय वनविभाग, ग्रामपंचायत विभाग व इतर विभाग यांचे ठरविण्यांत आलेले लक्षांक.

२) रोपे/झाडे लागवडीसाठी आवश्यक क्षेत्र निश्चित होणेसाठी लँड बँकची माहिती तयार करणे. त्यामध्ये प्रकर्षाने ग्रामपंचायत विभाग व इतर विभाग यांची माहिती तयार ठेवणे अत्यंत महत्वाचे असून वनविभागाची माहिती तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे वनेतर क्षेत्राची माहिती तयार असणे गरजेचे व क्रमप्राप्त आहे.

३) सन २०१८ च्या पावसाळ्यांत लागणाऱ्या रोपांच्या निर्मितीसाठी वनविभागाने केलेले नियोजन व मनरेगा अंतर्गत रोपवाटीका स्थापनेसाठी पाठविण्यांत आलेले प्रस्ताव, प्रशासकीय मान्यताप्राप्त प्रस्ताव व अद्याप प्रशासकीय मान्यता बाकी असलेले प्रस्ताव अशी माहिती सोबत आणावी.

४) पूर्व तयारीच्या दृष्टीने सदर आढावा बैठकीत मुख्य वनसंरक्षक, ठाणे/कोल्हापूर हे देखील सूक्ष्म नियोजनाच्या दृष्टीने मार्गदर्शन करणार आहेत.

उप आयुक्त (रोहयो), कोंकण विभाग करीता

प्रत: खालील नमूद विभागीय अधिकाऱ्यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील वृक्ष लागवडीच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने सदर बैठकीसाठी उपस्थित रहाण्यासाठी विनंती आहे.

१. अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे
२. मुख्य अभियंता, सा.बां.विभाग, मुंबई
३. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, मुंबई
४. पोलीस उपमहानिर्देशक, कोंकण विभाग, नवी मुंबई
५. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
६. आयुक्त, महानगरपालिका, नवी मुंबई
७. विभागीय कृषि सहसंचालक, ठाणे
८. उपआयुक्त विकास, कोंकण विभाग, कोंकण भवन
९. उपआयुक्त महसूल, कोंकण विभाग, कोंकण भवन
१०. सहनिबंधक, सहकार, कोंकण विभाग
११. उपसंचालक, शालेय शिक्षण, कोंकण विभाग
१२. उपसंचालक, माध्यमिक शिक्षण, कोंकण विभाग
१३. प्रादेशिक उपआयुक्त, सामाजिक न्याय, कोंकण विभाग
१४. उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य, कोंकण विभाग
१५. अधीक्षक अभियंता, जलसंधारण मंडळ, ठाणे
१६. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण, कोंकण विभाग, नवी मुंबई
१७. उपसंचालक, पशु संवर्धन, कोंकण विभाग, नवी मुंबई
१८. प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, कोंकण विभाग
१९. मुख्य अभियंता, महावितरण, कल्याण
२०. सह संचालक, उच्च तंत्रशिक्षण विभाग, मुंबई, कोंकण विभाग
२१. मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोंकण भवन
२२. स्वीय सहाय्यक, मा. विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांना-

२/- वरिल दिवशी ५० कोटी वृक्ष लागवड आढावा सभा जिल्हाधिकारी यांचे समवेत इतर वन विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार असून मा. विभागीय आयुक्त यांचे निर्देशानुसार सदर दिवशी दुपारी २.३० ते ३.३० वाजेदरम्यान वेळ राखून ठेवावा, ही विनंती.

उप आयुक्त (रोहयो) कोंकण विभाग करीता

उद्दिष्ट, संभाव्य वृक्षारोपण स्थळे व पुढील ३ वर्षातील वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट हयांची माहिती **विवरणपत्र क्र. ३** मध्ये दिली आहे. प्रत्येक विभागाने आणि त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या उद्दिष्टानुसार क्षेत्रिय यंत्रणांना अंतर्गत वाटप करण्याची पूर्णत: मुभा राहील. दिलेले उद्दिष्ट कशारितीने गाठावयाचे याबाबत संबंधित विभाग आणि त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख निर्णय घेतील.

१२. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतींना वर्ष २०१७ ते २०१९ पर्यंत अनुक्रमे १ कोटी, ३ कोटी आणि ८ कोटी वृक्ष लागवडीचे ग्रामपंचायतीनिहाय वर्षेवार वाटप **विवरणपत्र क्र. ४** मध्ये दिले आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीला दिलेले उद्दिष्ट गाठण्याकरिता सर्व ग्रामपंचायतींना वन विभाग, सामाजिक वनीकरण आणि वन विकास महामंडळ या विभागाकडून रोपनिर्मिती करून रोपांचा पुरवठा वन विभागामार्फत करण्यात येईल. ग्रामपंचायतीने वृक्ष लागवडीसाठी क्षेत्र आणि स्थळ निश्चिती केल्यानंतर प्रत्यक्ष लागवडीच्या दिवशी किंवा १ ते २ दिवस अगोदर वाहन उपलब्धतेनुसार रोपवाटिकेपासून वृक्षारोपण करावयाच्या ठिकाणापर्यंत रोपांच्या वाहतूकीची जबाबदारी वन विभागाची राहील. त्यासाठी लागणारा अतिरिक्त खर्च शासनास सोसावा लागेल. त्यानुसार वन विभागास अतिरिक्त आर्थिक तरतूद देण्यात येईल. **ग्रामपंचायतीमार्फत होणाऱ्या वृक्षारोपणाचे नियंत्रण, संनियंत्रण आणि अंमलबजावणी ग्राम विकास विभागामार्फत केली जाईल.**

१३. वन विभागाने विकसित केलेल्या जिओ टॅगिंग (Geo-Taging) या संगणकीय प्रणालीद्वारे अक्षांश व रेखांश यासह रोपे लागवडीसाठी वर नमूद केल्याप्रमाणे स्थळ निश्चिती आणि इतर कार्यवाही पूर्ण झाल्यावर खड्डे खोदणे ते माती, खत, किटकनाशके यांनी भरून तयार ठेवण्याबाबत दि. ३१ मार्च पर्यंत कार्यवाही करावी. त्यानंतर वृक्षारोपण आणि रोपांचे जगण्याचे प्रमाण ८० ते ९० % राहण्याच्या दृष्टीने संगोपन इत्यादी संदर्भातील माहिती यापूर्वीच्या दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणेच पुन्हा या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **विवरणपत्र-१ व विवरणपत्र-२** मध्ये संबंधित कार्यालयांना सादर करण्यात यावी. कार्यक्रमाची विहित कालमर्यादेत अंमलबजावणी करण्यामध्ये अडचणी राहणार नाहीत, हा त्यामागील उद्देश आहे.

**(उदा. २०१७ मधील वृक्षारोपणासाठी वर नमूद विविध टप्प्यांसाठी स्थळ निश्चितीचा डाटाबेस तयार करणे- ३० नोव्हेंबर, २०१६, वृक्षारोपण कार्यक्रमाचा सुक्ष्म प्लॅन तयार करणे- ३१ डिसेंबर २०१६ आणि खड्डे तयार करून माती, खत, किटकनाशके इत्यादींनी भरून तयार ठेवणे- ३१ मार्च, २०१७ असा राहील. पुढील २०१८ आणि २०१९ या वर्षांसाठी देखील त्या त्या वर्षात आणि त्याआधी करावयाच्या कार्यवाहीसाठी अशीच कालमर्यादा राहील).**

१४. प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत विभाग प्रमुख, विभागीय आयुक्त (महसूल) आणि प्रत्येक जिल्ह्याचे पालक सचिव यांनी दर ३ महिन्यांनी या संदर्भातील कार्यक्रमाचा आढावा घ्यावा व सनियंत्रण करावे. राज्यस्तरीय समितीमार्फत देखील या कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येईल. आवश्यकतेनुसार यापेक्षा कमी कालावधीत देखील सातत्याने सनियंत्रण करता येऊ शकेल. त्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणेचा प्रभावीपणे उपयोग करण्यात यावा.

१५. पुढील ३ वर्षातील वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपणापूर्वीची कामे, रोपांची उपलब्धता, प्रत्यक्ष वृक्षारोपण आणि वृक्ष जगण्याची यशस्वितता याबाबत संबंधित विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना व इतरांना आवश्यकतेनुसार तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन वन व सामाजिक वनीकरण विभागांतर्गत "समन्वय अधिकारी" आणि "स्थानिक अधिकारी" करतील. त्या अनुषंगाने प्रत्येक प्रशासकीय विभागांतर्गत जिल्हा व तालुकानिहाय "समन्वय अधिकारी" हे वन व सामाजिक वनीकरण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांबरोबर उत्तम सहकार्य ठेवतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१६१०१४१४४८५९१३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2016.10.17 16:53:14 +05'30'

(डी. एल. थोरात)
सह सचिव (वने)

सोबत:-

१) विवरणपत्र-१
२) विवरणपत्र-२
३) विवरणपत्र-३
४) विवरणपत्र -४
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि. ३१ मार्च २०१६.

प्रत :-

१) मा. मुख्य सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव व मुख्य राज शिष्टाचार अधिकारी आणि राज्य उत्पादन शुल्क, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन व बंदरे), मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अप्पर मुख्य सचिव, वैद्यकिय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अप्पर मुख्य सचिव, प्रशासकीय सुधारणा, र व का, साप्रवि, मंत्रालय, मुंबई
१०) अप्पर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई
११) अप्पर मुख्य सचिव, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग, मंत्रालय मुंबई
१३) प्रधान सचिव (लेखा व कोषागरे) वित्त विभाग, मंत्रालय मुंबई
१४) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा), मंत्रालय, मुंबई
१५) प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) प्रधान सचिव, नगरविकास विभाग-१, मंत्रालय, मुंबई
१९) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) सचिव, नगरविकास विभाग-२, मंत्रालय, मुंबई
२१) प्रधान सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
२२) प्रधान सचिव, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
२४) प्रधान सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई

२५) प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
२६) सचिव (प्रकल्प), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२७) सचिव (अपिल व सुरक्षा),गृहविभाग विभाग, मंत्रालय, मुंबई
२८) प्रधान सचिव, पणन विभाग, मंत्रालय, मुंबई
२९) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
३०) प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
३१) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३२) प्रधान सचिव, उदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई
३३) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३४) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
३५) प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई
३६) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३७) प्रधान सचिव, अल्पसंख्याक विभाग, मंत्रालय, मुंबई
३८) सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
३९) सचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
४०) सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
४१) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४२) सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४३) सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४४) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४५) सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
४६) सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
४७) आयुक्त, सर्व महानगरपालिका
४८) सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
४९) सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
५०) सचिव (प्रकल्प), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
५१) सचिव (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
५२) सर्व जिल्हाधिकारी
५३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
५४) सर्व पोलिस अधिक्षक/पोलिस आयुक्त
५५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर
५६) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण ,महाराष्ट्र राज्य,पुणे
५७) सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक.
५८) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
५९) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक).
६०) सर्व मुख्य वनसंरक्षक व प्रकल्प संचालक, वन्यजीव.
६१) वन संरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
६२) सर्व सह संचालक, उच्च व तंत्रशिक्षण
६३) सर्व परिवहन अधिकारी
६४) सर्व उपवनसंरक्षक, वन विभाग

६५) सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग
६६) सर्व विभागीय वन अधिकारी
६७) सर्व सहायक वनसंरक्षक
६८) सर्व जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक) व ( माध्यमिक )
६९) सर्व जिल्हा उद्योग अधिकारी
४१) सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ( जिल्हास्तर )
४२) सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग ( जिल्हास्तर )
४३) सर्व कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी
४४) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
४५) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक
४६) सर्व सहायक धर्मादाय आयुक्त (जिल्हास्तर )
४७) सर्व जिल्हा निबंधक सहकारी संस्था
४८) सर्व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास ( जिल्हास्तर )
४९) सर्व जिल्हा कृषी अधिकारी
५०) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका
५१) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
५२) सर्व जिल्हा माहिती अधिकारी
५३) सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल ), संबंधित तालुका
५४) सर्व तहसीलदार
५५) सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
५६) सर्व पोलीस निरिक्षक, तालुका पोलीस स्टेशन
५७) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका
५८) सर्व व्यवस्थापक, तालुका एस.टी. बस स्थानक
५९) सर्व वनक्षेत्रपाल, वन विभाग
६०) सर्व उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
६१) सर्व उप अभियंता, जलसंपदा विभाग
६२) सर्व उप अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती/पारेषण/वितरण कंपनी
६३) सर्व वैद्यकीय अधिक्षक, तालुका ग्रामिण रुग्णालये
६४) सर्व वैद्यकीय अधिकारी, तालुका प्राथमिक आरोग्य केंद्रे
६५) सर्व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सहकार विभाग
६६) सर्व तालुका कृषी अधिकारी
६७) सर्व गट शिक्षण अधिकारी
६८) सर्व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, आदिवासी विभाग
६९) सर्व लागवड अधिकारी, ( वनक्षेत्रपाल)
७०) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७१) निवडनस्ती/फ-११.

विवरणपत्र-१

Year ----------:- Online Format For Tree Plantation.

PIT Digging (Year ----------)

| Division | District | Taluka | Village | Compartment No/Gat. No. | Latitude-Longitude | Plantation Target | PITs/Trench Achievement During the Month | | | | Total | Percentage of PITs Completed |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Feb. | March | April | May | | |
| | | | | | | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | ६ | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| One Time Entry | | | | | | | | | | | =8+9+10+11 | =12/7*100 |

Planting

| Division | District | Taluka | Village | Compartment No/Gat. No. | Latitude-Longitude | Plantation Target | Total No. of PITs | Planting Achievement | | | Total | Percentage of Planting |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | First week | Second week | Third week | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | | | 10 | 11 |
| | | | | | | | | | | | | |
| Linked with PIT Digging | | | | | | | | | | | | =10/7*100 |

विवरणपत्र-२

जिल्ह्याचे नाव :-

सन २०१७ ते २०१९ या प्रत्येक वर्षामध्ये जून-जुलै महिन्यात केलेल्या वृक्षारोपणाची माहिती व वृक्षाचे जिवंत राहण्याचे प्रमाण याची आकडेवारी दर्शविणारे विवरणपत्र

(त्रैमासिक अहवाल)

| अ.क्र. | वृक्षारोपनासाठी निवडलेली स्थळे. | वन व सामाजिक वनीकरण विभागाकडून प्राप्त झालेल्या रोपांची संख्या. | वृक्षारोपनासाठी सहभाग घेतलेल्या यंत्रणा. | दिनांक ---------- रोजी लागवड केलेल्या रोपांची संख्या. | जिवंत रोपांची संख्या व टक्केवारी. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

-सही-

विभागीय आयुक्त (महसूल)

## विवरणपत्र : ३

सन २०१७ , २०१८ व २०१९ या ३ वर्षात विविध विभागांना एकंदर ९.५० कोटी वृक्षारोपणाच्या उद्दीष्टांतर्गत वर्षेनिहाय वाटप.

| अ. क्र. | विभागाचे नांव | वृक्षरोपणासाठी संभाव्य स्थळे | सन-२०१७ (एकूण उद्दीष्ट ७५ लाख) | सन-२०१८ (एकूण उद्दीष्ट २.५ कोटी) | सन-२०१९ (एकूण उद्दीष्ट ६.२५ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कृषी | १) प्रत्येक शेतकऱ्यांच्या मोकळ्या/पडीक जागा व शेतीचे बांध.<br>२) कृषी विभागांतर्गत विकसित होत असलेली पाणलोट क्षेत्रे.<br>३) कृषी संचालक, प्रकल्प संचालक (ATMA ), विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक आणि कृषी सहाय्यक कार्यालयांचा परिसर.<br>४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित अकोला व त्या अंतर्गत क्षेत्रीय कार्यालये. | १८,७५,००० | ६२,५०,००० | १,५६,२५,००० |
| २ | नगर विकास | १) नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालय, पुणे व त्याअंतर्गत प्रत्येक कार्यालयाचा परिसर<br>२ ) प्रत्येक नगर पालिका क्षेत्रात प्रति वॉर्ड.<br>३) प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रात प्रति वॉर्ड.<br>४) शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्या. (प्रत्येकी ६ CIDCO कार्यालये ).<br>५) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. (कल्याण/ठाणे/वडाळा क्षेत्र.)<br>६) पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण व त्या अंतर्गत कार्यालये.<br>७) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे.<br>८) नागपूर सुधार प्रन्यास (Nagpur Improvement Trust), नागपूर. | ७,५०,००० | २५,००००० | ६२,५०,००० |

| अ. क्र. | विभागाचे नांव | वृक्षरोपणांची रोपणासाठी संभाव्य स्थळे | सन-२०१७ (एकूण उद्दीष्ट ७५ लाख) | सन-२०१८ (एकूण उद्दीष्ट २.५ कोटी) | सन-२०१९ (एकूण उद्दीष्ट ६.२५ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सार्वजनिक बांधकाम | १) मुख्य अभियंता, प्रादेशिक विभाग प्रत्येकी.<br>२) सर्व अधीक्षक अभियंते प्रादेशिक विभाग प्रत्येकी.<br>३) कार्यकारी अभियंता हयांच्या कार्यक्षेत्रातील रस्ता दुतर्फा, रस्त्याच्या बाजूच्या मोकळया जागेत आणि बी.डी.डी. चाळींचा परिसर.<br>४) शासकीय कर्मचाऱ्यांच्या वसाहती प्रत्येकी.<br>५) शासकीय विश्रामगृहे प्रत्येकी.<br>६) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्या.मुख्य कार्यालय व क्षेत्रीय कार्यालये. | ७,५०,००० | २५,००००० | ६२,५०,००० |
| ४ | जल संपदा | १) प्रत्येक कार्यकारी संचालक,मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर.<br>२) प्रत्येक कार्यकारी अभियंताच्या कार्यक्षेत्रातील धरण स्थळे, कालवे दुतर्फा, मोकळया जागा इत्यादी.<br>३) शासकीय विश्रामगृहे प्रत्येकी. | ७,५०,००० | २५,००००० | ६२,५०,००० |
| ५ | सहकार व पणन व वस्त्रोद्योग | १) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे २) संचालक, पणन संचालनालय, पुणे व त्या अंतर्गत कार्यालय परिसर ३) व्यवस्थापक,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, प्रत्येकी ४) प्रत्येक सहकारी संस्थाच्या परिसरात ५) प्रत्येक सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरात ६) सूत गिरण्यांच्या परिसरात प्रत्येकी ७) लहान सहकारी संस्थाच्या परिसरात प्रत्येकी ८) गृहनिर्माण सहकारी संस्था प्रत्येकी ९) कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा परिसर १०) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या. व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर ११) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. मुंबई, व क्षेत्रीय कार्यालयांचा परिसर १२) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ मर्या. पुणे, व क्षेत्रीय कार्यालये परिसर १३) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्या. मुंबई, व क्षेत्रीय कार्यालये १४)महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ. पुणे व क्षेत्रीय कार्यालये. | ३,७५,००० | १२,५०,००० | ३१,२५,००० |

| अ. क्र. | विभागाचे नांव | वृक्षरोपणांची रोपणासाठी संभाव्य स्थळे | सन – २०१७ (एकूण उद्दीष्ट ७५ लाख) | सन – २०१८ (एकूण उद्दीष्ट २.५ कोटी) | सन – २०१९ (एकूण उद्दीष्ट ६.२५ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| ६ | उद्योग | १) उद्योग संचालनालय, मुंबई व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर.<br>२) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ (मुंबई) अंतर्गत प्रत्येक कारखाने आणि खाजगी क्षेत्रातील उद्योग.<br>३) MIDC परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा शक्य तिथे<br>४) कोकण-विकास महामंडळ मर्यादित. मुंबई व त्या अंतर्गत कार्यालय परिसर.<br>५) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित. पुणे व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर.<br>६) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित. (मेल्ट्रॉन) मुंबई व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर.<br>७) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित नागपूर, व क्षेत्रीय कार्यालयांचा परिसर.<br>८) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल महामंडळ मर्यादित मुंबई व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर.<br>९) महाराष्ट्र ऑद्योगिक विकास महामंडळ मुंबई आणि व क्षेत्रीय कार्यालयांचा परिसर.<br>१०) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर. | ३,७५,००० | १२,५०,००० | ३१,२५,००० |
| ७ | शालेय शिक्षण | १) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, खाजगी परंतु अनुदानित प्राथमिक/माध्यमिक शाळां,खेळांची मैदाने प्रत्येकी. | ३,७५,००० | १२,५०,००० | ३१,२५,००० |
| ८ | उच्च व तंत्र शिक्षण | १) विद्यापीठांच्या परिसरात प्रत्येकी.<br>२) महाविद्यालयांच्या परिसरात प्रत्येकी. | १,८७,५०० | ६,२५,००० | १५,६२,५०० |

| अ. क्र. | विभागाचे नांव | वृक्षरोपणांची रोपणासाठी संभाव्य स्थळे | सन-२०१७ (एकूण उद्दीष्ट ७५ लाख) | सन-२०१८ (एकूण उद्दीष्ट २.५ कोटी) | सन-२०१९ (एकूण उद्दीष्ट ६.२५ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| ९ | गृह विभाग | १) पोलीस महासंचालक व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर.<br>२) पोलीस उपमहानिरीक्षक व त्या अंतर्गत कार्यालयांचा परिसर.<br>३) सर्व पोलीस आयुक्त आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अंतर्गत कार्यालये प्रत्येकी.<br>४) पोलीस मैदाने, पोलिसांच्या शासकीय वसाहती प्रत्येकी.<br>५) पोलीस स्टेशनच्या परिसरात प्रत्येकी.<br>६) पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ व त्या अंतर्गत कार्यालये परिसर. | १,५०,००० | ५,००,००० | १२,५०,००० |
| १० | आदिवासी विकास | १) आश्रम शाळा, वसतीगृहे व विश्रामगृहे इत्यादी ठिकाणांचा परिसर.<br>२) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, क्षेत्रीय कार्यालये परिसर.<br>३) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, क्षेत्रीय कार्यालये परिसर. | १,८७,५०० | ६,२५,००० | १५,६२,५०० |
सदर विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचे संदर्भिय पत्रातसोबत जोडलेल्या प्रपत्र क्र.१ ते प्रपत्र क्र.६ च्या मुद्दयांच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती दि.०२.०४.२०१८ पर्यंत या कार्यालयास सादर करावी.

सोबत संदर्भिय पत्र.

आपला,

(जे. आर. निखाडे)
सहाय्यक संचालक (तां)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबइ

Z:\Sheetal\SNC\Pariptrak.docx

# महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे

क्र.:- सावनि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१८.

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व जिल्हाधिकारी.

विषय:- **सन २०१८ मधील १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पूर्वतयारी, आव्हाने व उपाययोजना इत्यादींबाबत विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी ह्यांचे समवेत सचिव (वने) ह्यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करावयाच्या बैठका.**

महोदय,

दिनांक ०२ आणि ०३ फेब्रुवारी, २०१८ रोजी नागपूर येथे मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) हयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वरिष्ठ वन अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेमध्ये ठरल्याप्रमाणे सचिव (वने) हे प्रथम टप्प्यात सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांच्या समवेत विषयांकित प्रकरणी बैठका घेत आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये संबंधित विभागीय आयुक्त यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हाधिकारी आणि इतर प्रशासकीय विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत वृक्ष लागवड उद्दिष्टाच्या अनुषंगाने नियोजन आणि पूर्वतयारीबाबत सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली बैठका आयोजित केल्या जाणार आहेत. **विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात होणाऱ्या प्रस्तावित बैठकांचे वेळापत्रक लवकरच पाठविण्यात येईल.**

ह्या बैठकांना संबंधित प्रशासकीय विभागांचे विभाग प्रमुख व जिल्हास्तरीय प्रमुख अधिकारी उपस्थित राहतील. त्याचबरोबर प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन आणि व्यवस्थापन), नागपूर व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर आणि श्री. डी. एल. थोरात, विशेष अधिकारी (वने), सह सचिव संवर्ग, मंत्रालय हे उपस्थित राहतील.

प्रस्तावित १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य दिशेने व्हावी, यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागाने सर्वसाधारणपणे माहिती न देता अधिक विशिष्ट स्वरुपात (**From General to Specific**) माहिती द्यावयाची आहे. **त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभागांना जिल्हानिहाय दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे संकलित करावयाच्या जिल्हानिहाय माहितीसंदर्भातील राज्य शासनाचे प्रशासकीय विभाग व केंद्र शासनाकडील विभाग समाविष्ट करून एकंदर ३३ विभागांची यादी (परिशिष्ट-१) आणि प्रपत्रे सोबत जोडली आहेत.** सदर यादी ५० कोटी वृक्ष लागवडी संदर्भातील शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक सावनि-२०१६/ प्र.क्र.८०/ फ-११ दिनांक १०.१०.२०१६ अन्वये **विवरणपत्र - ३** प्रमाणे विविध प्रशासकीय विभागांना दिलेल्या उद्दिष्टानुसार आहे. ज्याठिकाणी एखादया विभागाची माहिती दिलेल्या पप्रत्रातील कॉलममध्ये संकलित करण्यास अडचण असल्यास अन्य योग्य त्या कॉलममध्ये माहिती भरण्यास मुभा असेल. परंतु, मूळ ढाचा बदलला जाणार नाही हयाची कृपया काळजी घ्यावी.

(कृ.मा.प.)

सदर माहिती संकलित झाल्यास प्रत्येक प्रशासकीय विभागांतर्गत जिल्हानिहाय वृक्ष लागवडीसाठी किती वाव आहे, याचा निश्चित अंदाज बांधता येईल. त्यानुसार वृक्षारोपण कार्यक्रमाची नियोजनबध्दरित्या अंमलबजावणी करण्यास अधिक सुस्पष्टता येईल.

त्यानुसार बैठकीपूर्वी जिल्हास्तरावरील प्रत्येक प्रशासकीय विभागास दिलेले वृक्ष लागवडी संदर्भातील नियोजन आणि तयारीबाबत वर नमूद केल्याप्रमाणे विविध प्रपत्रे दिली आहेत. त्यामध्ये विशेषत: वृक्ष लागवडीसाठी जिल्हास्तरावर लँण्ड बँक तयार करणे, वृक्ष लागवडीसाठी स्थळ निश्चिती, समन्वय अधिकाऱ्यांच्या नेमणूका, दि. ३१ मार्च, २०१८ पुर्वी खड्डे तयार करणे, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण रोपांची उपलब्धता, प्रत्यक्षात जुलै-२०१८ मध्ये वृक्ष लागवडीसाठी मनुष्यबळाची उपलब्धता, सदर माहिती वन विभागाच्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर अपलोड करणे व यापूर्वीच्या २ आणि ४ कोटी वृक्ष लागवडींतर्गत रोपांचे जिवंत राहण्याचे प्रमाण व माहिती वृक्षारोपण स्थळांसह वन विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करणे इत्यादीबाबत माहितीचा समावेश आहे. **त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्याच्या अंतर्गत संबंधित प्रशासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन वर नमूद केल्याप्रमाणे सोबत जोडलेल्या प्रशासकीय विभागानिहाय प्रपत्रांनुसार माहिती संकलित करावी.**

सर्व प्रशासकीय विभागांची जिल्हानिहाय माहिती संकलित झाल्यानंतर त्याची पुस्तिका तयार करावी. त्यानंतर प्रस्तावित वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन आणि पूर्वतयारीबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीत सादरीकरण करावयाचे आहे. जिल्हानिहाय लँण्ड बँकेची पुस्तिका तयार झाल्यास नियोजित बैठकीमध्ये त्यासंदर्भातील आढावा घेणे सुलभ होऊ शकेल. **जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण जिल्ह्यातील विविध प्रशासकीय विभागांच्या माहितीसंदर्भातील एकत्रित गोषवाराविषयक परिशिष्ट-२ सोबत जोडले आहे. त्यानुसार संबधित जिल्हाधिकारी यांनी कृपया सादरीकरण करावे.**

त्याचप्रमाणे संबंधित विभागीय आयुक्त यांनी सचिव (वने) यांच्या अध्यक्षेखाली होणाऱ्या बैठकीमध्ये प्रादेशिक विभागांतर्गत एकंदरीत वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन आणि तयारीबाबत सादरीकरण करावयाचे आहे. **त्यासंदर्भातील प्रादेशिक विभागांतर्गत विविध विभागांच्या माहितीचे गोषवाऱ्यासंदर्भातील परिशिष्ट-३ सोबत जोडले आहे. त्यानुसार संबधित विभागीय आयुक्त यांनी कृपया सादरीकरण करावे.**

सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखालील बैठका लवकरच आयोजित करावयाच्या असल्याने यासंदर्भातील माहिती संबंधित प्रशासकीय विभागांसमवेत समन्वय आणि संनियत्रण करुन तातडीने तयार करण्यात यावी, अशी शासनाच्या निर्देशानुसार विनंती आहे.

आपला,

(अतुल कोदे),
सह सचिव (वने),
महसूल व वन विभाग.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

१) सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
३) सर्व आयुक्त, महानगरपालिका.
४) सर्व प्रशासकीय विभागांतर्गत विभाग प्रमुख.
५) सर्व प्रशासकीय विभागांतर्गत जिल्हास्तरीय प्रमुख अधिकारी.

(क्र.पढील पानांवर पहावे)

## परिशिष्ट - १

## ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत विविध प्रशासकीय विभागांतर्गत जिल्हानिहाय दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे संकलित करावयाची माहिती.

| अ.क्र | विभागाचे नाव | एकूण प्रपत्रे | प्रपत्र क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | कृषी | ९ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-९ |
| २ | नगर विकास | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| ३ | सार्वजनिक बांधकाम | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| ४ | जलसंपदा | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| ५ | सहकार व पणन व वस्त्रोद्योग | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| ६ | उद्योग | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| ७ | शालेय शिक्षण व क्रिडा | ५ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-५ |
| ८ | उच्च व तंत्र शिक्षण | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| ९ | गृह विभाग | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| १० | आदिवासी विकास | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| ११ | सामाजिक न्याय , विशेष सहाय्य | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| १२ | सांस्कृतिक कार्य व पर्यटन | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| १३ | सार्वजनिक आरोग्य | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| १४ | उर्जा | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| १५ | वैद्यकिय शिक्षण आणि औषध द्रव्ये | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| १६ | गृह ( राज्य ऊत्पादन शुल्क ) | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र. ४ |
| १७ | गृह ( कारागृह ) | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| १८ | गृह (परिवहन ) | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| १९ | कामगार | ३ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-३ |
| २० | विधी व न्याय | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| २१ | जलसंधारण | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| २२ | कौशल्य विकास व उद्योजकता | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| २३ | महसूल | ७ | प्रपत्र क्र. १ ते प्रपत्र क्र.-७ |
| २४ | महिला व बाल कल्याण | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| २५ | पाणी पुरवठा व स्वच्छता | ३ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-३ |
| २६ | पदुम | ६ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-६ |
| २७ | अल्पसंख्यांक विभाग | ३ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-३ |
| २८ | वित्त विभाग | ४ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-४ |
| २९ | ग्रामविकास विभाग | ७ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-७ |
| ३० | गृह निर्माण | ३ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र. ३ |
| ३१ | केंद्रीय संरक्षण विभाग | ३ | प्रपत्र क्र. १ ते प्रपत्र क्र.-३ |
| ३२ | राज्यातील केंद्र शासनाची विविध कार्यालये | ३ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-३ |
| ३३ | केंद्र शासनांतर्गत वेस्टर्न कोल फिल्ड | ३ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र.-३ |
| ३४ | विविध विभागांचे जिल्हानिहाय उद्दिष्टानुसार गोषवारा :-परिशिष्ठ - २ | ३ | प्रपत्र क्र. -१ ते प्रपत्र क्र. ३ |
| ३५ | विविध विभागांचे प्रादेशिक स्तरावरील उद्दिष्टानुसार गोषवारा:- परिशिष्ठ - ३ | ४ | प्रपत्र क्र. १ ते प्रपत्र क्र. ४ |

वर नमूद केलेल्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागाच्या प्रादेशिक विभाग प्रमुखांना आणि जिल्हास्तरावरील प्रमुख अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या नमुना प्रपत्रानुसार आणि पत्रात स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती संकलित करण्यात यावी. तसेच त्यासंदर्भातील सादरीकरण आणि इतर आवश्यक माहितीसह बैठकीस उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी:-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे.
३) महाव्यवस्थापक, महाराष्ट वन विकास महामंडळ, नागपूर.
४) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन आणि व्यवस्थापन), नागपूर व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
६) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे / कोल्हापूर / नागपूर / चंद्रपूर / गडचिरोली / नाशिक / ठाणे / अमरावती / यवतमाळ/ धुळे/ औरंगाबाद.
७) महाव्यवस्थापक, जागतिक खाद्य कार्यक्रम व वनीकरण, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर विभाग / महाव्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ उत्तर चंद्रपूर विभाग / दक्षिण चंद्रपूर विभाग / नाशिक विभाग आणि प्रादेशिक व्यवस्थापक, सांगली.
८) सर्व वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण.
९) सर्व उप वनसंरक्षक (प्रा.)
१०) सर्व विभागीय वन अधिकारी (प्रा.)
११) सर्व विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण).
१२) विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, यवतमाळ / नागपूर / गोंदिया / गोरेवाडा / पश्चिम चांदा / मध्य चांदा / ब्रम्हपूरी / बल्लारशा / मारखांडा / प्रन्हिता / पश्चिम नाशिक / नंदूरबार / ठाणे / डहाणू/ किनवट.

१) विभागाचे नाव - उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

२) २०१८ मधील वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट - ६,२५,०००.

३) जिल्हानिहाय वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध लॅन्ड बँक आणि २ व ४ कोटी वृक्ष लागवडी अंतर्गत वृक्षाचे जिवंत राहण्याचे प्रमाण.

४) एकूण प्रपत्रे -६ (प्रपत्र क्र.१ ते प्रपत्र -६ ).

प्रपत्र क्र- १

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत जिल्ह्यातील विद्यापीठनिहाय व संलग्न महाविद्यालय निहाय वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध होणारे क्षेत्र.

| अ. क्र | विद्यापीठाचे नाव व परिसरात वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध क्षेत्र (हेक्टर). | संलग्न महाविद्यालयाचे नाव व परिसरात वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध क्षेत्र (हेक्टर). | वृक्ष लागवडीसाठी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांची एकंदर संख्या व एकंदर उपलब्ध क्षेत्र (हेक्टर). | स्तंभ क्रमांक ४ पैकी सन २०१८ मधील वृक्ष लागवडीसाठी प्रस्तावित क्षेत्र. ( हेक्टर ) | स्तंभ -५ नुसार वृक्षांची एकुण संख्या ( प्रति हेक्टरी १००० रोपे) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | उदा. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | १) | | | |
| | | २) | | | |
| | | ३) इत्यादी | | | |
| | | | | | |
| | | एकंदर क्षेत्र (हेक्टर) | | | |
| २ | | १)<br>२) इत्यादी | | | |
| ३ | | | | | |
| इत्यादी | | | | | |
| एकंदर | | | | | |

## प्रपत्र क्र- २

### उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत जिल्ह्यातील कार्यालयांचा परिसर

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव (जिथे लागू असेल तिथे) | उपलब्ध जागेवर अंदाजित लागवड करावयाच्या झाडांची एकूण संख्या. | स्तंभ -३ पैकी २०१८ मध्ये प्रस्तावित लागवडीसाठी झाडांची संख्या. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | संचालक, उच्च शिक्षण | | |
| २ | संचालक, तंत्र शिक्षण | | |
| ३ | विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) | | |
| ४ | विभागीय सहसंचालक (तंत्र शिक्षण) | | |
| ५ | उप संचालक (उच्च शिक्षण) | | |
| ६ | उप संचालक (तंत्र शिक्षण) | | |
| ७ | इतर कार्यालये | | |
| ८ इत्यादी | | | |
| एकूण | | | |

प्रपत्र क्र- ६

४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन- २०१७ मध्ये लावलेल्या झाडांच्या जिंवत राहण्याची टक्केवारी.

| अ. क्र | तालुक्याचे नाव | वृक्षरोपणाची स्थळे | | ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेली झाडे (हजारात किंवा लाखात) | दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ किंवा सद्याच्या मोजणीप्रमाणे जिवंत झाडे आणि टक्केवारी | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | |
| १ | | १ | | | | |
| २ | | २ | | | | |
| ३ | | ३ | | | | |
| एकूण | | इत्यादी | | | | |

प्रपत्र क्र- ५

२ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत सन- २०१६ मध्ये लावलेल्या झाडांच्या जिवत राहण्याची टक्केवारी.

| अ. क्र | तालुक्याचे नाव | वृक्षरोपणाची स्थळे | | २ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लावण्यात आलेली झाडे (हजारात किंवा लाखात) | दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ किंवा सद्याच्या मोजणीप्रमाणे जिवंत झाडे आणि टक्केवारी | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | |
| १ | | १ | | | | |
| २ | | २ | | | | |
| ३ | | ३ | | | | |
| एकूण | | इत्यादी | | | | |

## प्रपत्र क्र- ४

## प्रादेशिक विभागातील लँड बँकचा गोषवारा

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | वृक्षरोपणासाठी प्रपत्र-३ प्रमाणे एकूण उपलब्ध क्षेत्र (हेक्टर) | स्तंभ- ३ पैकी २०१८ मध्ये प्रस्तावित लागवडीसाठी क्षेत्र (हेक्टर / झाडांची संख्या) | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती | निवडलेल्या वृक्षारोपण स्थळांच्या ठिकाणी दि. ३१.०३.२०१८ पर्यंत खड्डे तयार करण्याबाबत सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| इत्यादी | एकूण | | | | |

## प्रपत्र क्र- ३
## जिल्हयातील लँड बँकचा गोषवारा

| अ. क्र. | वृक्षरोपणाची संभाव्य स्थळे | उपरोक्त प्रपत्रानुसार एकूण उपलब्ध क्षेत्र (हेक्टर) | स्तंभ- ३ पैकी २०१८ मध्ये प्रस्तावित लागवडीसाठी क्षेत्र (हेक्टर / झाडांची संख्या) | वृक्षारोपण स्थळांची माहिती वन विभागाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर अपलोडची सद्य:स्थिती | निवडलेल्या वृक्षारोपण स्थळांच्या ठिकाणी दि. ३१.०३.२०१८ पर्यंत खड्डे तयार करण्याबाबत सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जिल्ह्यातील विद्यापीठ व संलग्न महाविद्यालये | | | | |
| २ | उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत कार्यालये | | | | |
| | एकूण | | | | |

# महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे
बैठकीची सूचना

क्र.:-साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १९ मार्च, २०१८.

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व).
२. जिल्हाधिकारी (सर्व).
३. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
५. प्रशासकीय विभागांचे प्रादेशिक प्रमुख / विभाग प्रमुख (सर्व).

विषय:- सन २०१८ मधील १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नियोजन, पूर्वतयारी, आव्हाने व उपाययोजना इत्यादींबाबत विभागीय आयुक्त (महसूल), जिल्हाधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांसमवेत सचिव (वने) ह्यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकांमध्ये मु.पो. रानमाळा, ता. खेड, जि. पूणे या ग्रामपंचायत क्षेत्रात विविध प्रसंगी घेण्यात येणारी वृक्ष लागवड योजना नागरी आणि ग्रामीण भागात लागू करण्याबाबत सादरीकरण.

संदर्भ:- **१. शासन समक्रमांकाचे पत्र दि. २७ फेब्रुवारी, २०१८.**
**२. शासन समक्रमांकाचे पत्र दि. ८ मार्च, २०१८.**

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे. संदर्भ क्र. १ आणि २ येथील पत्रानुसार बैठकांचे वेळापत्रक आणि प्रत्येक प्रशासकीय विभागाने संकलित करावयाची माहिती याबाबतचे प्रपत्रे देण्यात आली आहेत. तसेच प्रस्तावित बैठकांमध्ये संबंधित जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि विभागीय आयुक्त यांनी कोणत्या बाबींवर सादरीकरण करावे, हे सुध्दा कळविण्यात आले आहे.

लोकसहभागाद्वारे वनेत्तर (Non Forest Area ) क्षेत्रावर वृक्ष लागवडीवर भर देण्याच्या उद्देशाने वन विभागाने अनेक नाविन्यपूर्ण संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये इतर प्रशासकीय विभागांना सहभागी करुन घेण्यात येत आहे. मु. पो. रानमाळा, ता. खेड, जि. पुणे येथील संयुक्त वन व्यवस्थापन समिती आणि ग्रामपंचायतीमार्फत दरवर्षी जन्म, विवाह, मृत्यु आणि काही आनंददायी घटना या प्रसंगी शुभेच्छा वृक्ष, आनंद वृक्ष, शुभमंगल वृक्ष/ माहेरची झाडी , स्मृती वृक्ष लावून संपूर्ण गाव हिरवेगार करण्यात आले आहे. वृक्ष लागवडीस जलसंधारणाची जोड दिली आहे. त्यामुळे गाव हिरवेकंच आणि पर्यावरण समृध्द झाले आहे. अनेक लोक हे गाव पाहण्यासाठी येथे आवर्जून भेटी देतात.

शहरी भागातील महानगरपालिका, नगरपालिका/ नगर पंचायत आणि ग्रामीण भागातील ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये रानमाळा गावातील योजना लागू करण्यासाठी नगर विकास विभाग व ग्रामविकास विभागास वन विभागाकडून विनंती करण्यात आली होती.

त्यानुसार नगर विकास विभागाने दि. १ मार्च, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्याचप्रमाणे ग्रामविकास विभागाने दि. १६ मार्च, २०१८ रोजी शासन निर्णय काढला आहे. त्यानुसार "वृक्षाची जोपासना हिच निसर्गाची उपासना" ही योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार वर नमूद केलेले वेगवेगळे प्रसंग विचारात घेऊन वर्षातून एकदा महानगरपालिका, नगरपालिका/ नगर पंचायत आणि ग्रामपंचायतींमार्फत वृक्षांचे वाटप दि. ३० जून या दिवशी केले जाईल. प्रत्यक्षात झाडे दि. १ ते ७ जुलै या कालावधीत लावली जातील. त्यातून शहरी व ग्रामीण क्षेत्रात अधिक सुरक्षित पर्यावरण आणि परिसर हिरवागार होण्यास मदत होणार आहे.

उपसंचालक, वनशिक्षण
विभागीय कार्यालय, मुंबई ५१.
आवक क्रमांक : 2528
दिनांक :
22 MAR 2018

वर नमूद केलेल्या दोन्ही शासन निर्णयांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. सदर योजनांची तातडीने अंमलबजावणी सुरु होणे अपेक्षित आहे. तरी रानमाळा गावाच्या धर्तीवर नागरी आणि ग्रामीण क्षेत्रामध्ये सदर योजना लागू करण्याबाबत संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी (नगरपालिका/ नगरपंचायत क्षेत्रासाठी ) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (ग्रामपंचायत क्षेत्रासाठी ) यांनी कशाप्रकारे नियोजन केलेले आहे किंवा प्रस्तावित आहे, याबाबत विभागीय आयुक्त (महसूल ) यांच्याबरोबर होणाऱ्या प्रस्तावित बैठकांमध्ये सादरीकरण करावे, अशी शासनाचे निर्देश आहेत. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.

आपला,

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

सोबत:- १. शासन निर्णय, नगर विकास विभाग दि. १ मार्च, २०१८.
२. शासन निर्णय, ग्रामविकास विभाग दि. १६ मार्च, २०१८.

प्रत माहितीसाठी:-
१) मा. मुख्य सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३) मा. मंत्री (वित्त, नियोजन व वने) यांचे खाजगी सचिव.
४) मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.

प्रत माहिती आणि कार्यवाहीसाठी:-
१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर.
२) महाव्यवस्थापक, महाराष्ट वन विकास महामंडळ, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन आणि व्यवस्थापन), नागपूर. व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे.
५) सर्व पालक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
७) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) (सर्व).
८) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ (सर्व).

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी:-
१) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण (सर्व).
२) उप वनसंरक्षक (प्रा.) (सर्व).
३) सर्व विभागीय वन अधिकारी (प्रा.) (सर्व).
४) विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) (सर्व).
५) विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ (सर्व).

वन विभागाच्या वरील अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायती आणि ग्रामपंचायती क्षेत्रात सदर योजना लागू करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यासंदर्भातील नियोजन व कृती आराखडा तयार करण्याबाबत त्यांना विनंती करावी. तसेच यासंदर्भात लागणारा तांत्रिक सल्ला व मदत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात यावी.

प्रत माहितीसाठी :-

१) सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
२) सर्व प्रशासकीय विभागांचे सह सचिव / उप सचिव संवर्गातील समन्वय अधिकारी.

**प्रत माहितीसाठी :- सर्व प्रशासकीय विभागांचे प्रादेशिक प्रमुख :-**

१) विशेष पोलीस महानिरीक्षक (सर्व), गृह विभाग.
२) जिल्हा पोलीस आयुक्त, गृह विभाग (जिथे संबंधित असेल तिथे)
३) पोलीस उपमहानिरिक्षक (कारागृह) पुणे, औरंगाबाद,नाशिक,नागपूर/अमरावती आणि विशेष पोलीस महानिरिक्षक (कारागृह), मुंबई, कोकण विभाग, गृह (कारागृहे विभाग).
४) प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व), गृह (परिवहन विभाग).
५) उप विभागीय आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क) (सर्व), गृह (राज्य उत्पादन शुल्क विभाग).
६) कार्यकारी संचालक, सिंचन महामंडळे (सर्व), जलसंपदा विभाग.
७) विभागीय सह संचालक (कृषी) (सर्व). कृषी विभाग.
८) मुख्य अभियंता (प्रा.) (सर्व), सार्वजनिक बांधकाम विभाग.
९) विभागीय सह निबंधक (सर्व). सहकार विभाग.
१०) सह संचालक (पणन), संचालक (पणन) यांचे कार्यालय, पुणे, सहकार व पणन विभाग.
११) सह संचालक (उद्योग) (सर्व), उद्योग विभाग.
१२) उप संचालक (शिक्षण) (सर्व), शालेय शिक्षण विभाग.
१३) सह संचालक (उच्च शिक्षण) (सर्व), उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
१४) सह संचालक (तंत्र शिक्षण ) (सर्व), उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
१५) अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर (संबंधित अतिरिक्त आयुक्त पुणे व औरंगाबाद येथील कार्यभारासह) आदिवासी विकास विभाग.
१६) प्रादेशिक उपायुक्त (सर्व), सामाजिक न्याय विभाग.
१७) सह संचालक (सांस्कृतिक), सांस्कृतिक कार्य संचालनालय कार्यालय, पर्यटन व सांस्कृतिक विभाग.
१८) सह संचालक (पर्यटन), महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ कार्यालय, पर्यटन व सांस्कृतिक विभाग.
१९) उप संचालक (आरोग्य) (सर्व), सावर्जनिक आरोग्य विभाग.
२०) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (सर्व), उर्जा विभाग.
२१) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (सर्व), उर्जा विभाग.
२२) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (सर्व), उर्जा विभाग.
२३) सह संचालक (वैद्यकीय शिक्षण), संचालक वैद्यकीय शिक्षण कार्यालय, मुंबई, वैद्यकीय शिक्षण विभाग.
२४)उप आयुक्त (कामगार) (सर्व), कामगार विभाग.
२५) अधिक्षक अभियंता (स्थानिक स्तर) (सर्व),जलसंधारण विभाग.
२६) सह संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण ) (सर्व), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग.
२७)उप आयुक्त (महिला बाल विकास विभाग) (सर्व), महिला व बालविकास विभाग.
२८) अधिक्षक अभियंता (पाणीपुरवठा) (सर्व), पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.
२९) सह आयुक्त (पदुम) (सर्व), पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स विभाग.
३०) सह संचालक (लेखा व कोषागरे) (सर्व), लेखा व कोषागरे संचालनालय, वित्त विभाग.
३१) गृह निर्माण विभागांतर्गत प्रादेशिक स्तरावरील गृह निर्माण मंडळाचे प्रमुख.
३२) केंद्रीय संरक्षण विभागांतर्गत संबंधित अधिकारी.
३३) केंद्र शासनांतर्गत वेस्टन कोल फिल्डचे संबंधित अधिकारी (जिथे संबंधित आहे तिथे).
३४)केंद्र शासनांतर्गत इतर कार्यालयांशी संबंधित अधिकारी.

प्रत माहितीसाठी :-

१) आयुक्त (कृषी).
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ.
३) संचालक (सार्वजनिक आरोग्य), सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
४) संचालक (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण विभाग.
४) संचालक (सांस्कृतिक कार्य) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.

"वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना" या योजनेंतर्गत शहरी भागात वृक्ष लागवडीचा भरीव कार्यक्रम हाती घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण- २०१६/ प्र.क्र.६०/नवि-३४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १ मार्च, २०१८.

वाचा:

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: सावनि-२०१५/प्र.क्र.१३१/फ-११, दि. ३१.०३.२०१६
२. शासन निर्णय समक्रमांकित दिनांक १७ मे, २०१६
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक: सावनि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दि. १०.१०.२०१६
४. शासन निर्णय समक्रमांकित दिनांक ६ मार्च, २०१७

प्रस्तावना:-

राष्ट्रीय वननिती, १९८८ मधील धोरणानुसार देशाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्रावर वृक्षाच्छादन/ वनीकरण असणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात हे प्रमाण एकूण भौगोलिक क्षेत्राच्या सर्वसाधारणपणे २० टक्के आहे.

२. जागतिक तापमानात सातत्याने होणारी वाढ, हवामान आणि ऋतूमध्ये होणारे बदल, दुष्काळ किंवा अतिवृष्टी, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तींवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वृक्ष लागवडीचा भरीव कार्यक्रम हाती घेणे आवश्यक असल्याची बाब जागतिक स्तरावर मान्य झाली आहे. त्या अनुषंगाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम व्यापक व विस्तृत प्रमाणात राबविणे अत्यंत आवश्यक आहे. वृक्ष लागवडीचा हा कार्यक्रम लोकचळवळीत रूपांतरित होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक, व्यक्ती, कुटूंब, संस्था इत्यादींचा सक्रीय सहभाग अतिशय महत्वपूर्ण आहे.

३. पुणे जिल्ह्यातील रानमळा, ता. खेड (राजगुरूनगर) या गावात ग्रामपंचायतींच्या माध्यमातून ग्रामस्थांकडून जन्म, विवाह आणि मृत्यू इत्यादी प्रसंगांच्या निमित्ताने लोकसहभागातून वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला जातो. या गावातील ग्रामस्थांकडून घराच्या आजूबाजुला, मोकळ्या जागेत, परसबागेत किंवा शेतीच्या बांधावर वृक्ष/फळझाडांची रोपे लावून आपल्या प्रिय व्यक्तीची आठवण दिर्घकाळासाठी जपण्यात येते. या उपक्रमामुळे रानमळा हे गाव हिरवेगार आणि पर्यावरण समृध्द होण्यास मोठा हातभार लागला असून गावातील कुटुंबांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन निर्माण झाले आहे.

४. राज्यातील वनक्षेत्र २०% वरून ३३% पर्यंत नेण्यासाठी "हरित महाराष्ट्र" हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्याला हिरवेगार आणि सुरक्षित पर्यावरणाच्या दिशेने नेण्यासाठी रानमळा ग्रामपंचायतीच्या धर्तीवर शहरी भागात सर्व महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या क्षेत्रांमध्ये वृक्ष लागवडीचा व्यापक व विस्तृत कार्यक्रम हाती घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन राज्यातील प्रत्येक महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या क्षेत्रामध्ये "वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना" ही योजना राबविण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. सदर योजना महानगरपालिका/नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या मार्फत राबविली जाईल. या योजनेंतर्गत वृक्ष लागवडीबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

- **जन्म वृक्ष:-** महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायतींच्या क्षेत्रात जन्माला येणाऱ्या बालकांच्या जन्माचे स्वागत संबंधित कुटूंबाला वृक्षांची/फळझाडांची रोपे देवून करण्यात यावे. त्या रोपांचे रोपण करून तसेच आपल्या बाळाप्रमाणे जीव लावून त्याचे संवर्धन करण्याची विनंती संबंधित कुटुंबास करण्यात यावी.
- **शुभमंगल वृक्ष/ माहेरची झाडी-:** दरवर्षी महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायतींच्या क्षेत्रातील विवाह प्रसंगी वधु-वरांना शुभाशिर्वाद म्हणून वृक्षांची/फळझाडांची रोपे भेट म्हणून द्यावीत.महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायतींच्या क्षेत्रातील ज्या मुलींचे विवाह होऊन त्या सासरी गेलेल्या असतात. त्यांना सासरी जावून झाडाचे रोपे देणे अवघड असते. सबब या विवाहित मुलींच्या माहेरच्या लोकांना वृक्षांची/फळझाडांची रोपे देवून मुलीच्या अनुपस्थितीत आपल्या लेकीप्रमाणेच माया देवून त्या झाडाची संगोपन करण्याबाबत संबंधित कुटूंबास विनंती करण्यात यावी.
- **आनंद वृक्ष:-** महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायतींच्या क्षेत्रातील विद्यार्थी दहावी व बारावीची किंवा इतर काही परीक्षा उत्तीर्ण होतात, तरुण/ तरुणींना नोकऱ्या मिळतात आणि विविध निवडणूकांमध्ये उमेदवार विजयी होतात, अशा आनंदाच्या क्षणी त्यांना वृक्षांची/फळझाडांची रोपे देवून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा द्याव्यात.
- **स्मृती वृक्ष:-** महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या क्षेत्रातील व्यक्तींचे निधन झाल्यानंतर त्या व्यक्तीच्या कुटुंबियांना वृक्षांची/फळझाडांची रोपे देवून संबंधित व्यक्तीस श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. सदर व्यक्तीच्या कुटुंबियांना त्या रोपांचे रोपण करून झाडाच्या रूपाने आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मृती जतन करण्याबाबत विनंती करण्यात यावी.

महानगरपालिका/नगरपरिषद/ नगरपंचायत क्षेत्रांमध्ये प्रत्येक वार्डनिहाय जन्म, मृत्यु, विवाह याप्रसंगाच्या नोंदणीसाठी स्वतंत्र कार्यालये आहेत. लोक प्रसंगानुरुप नोंदणी प्रमाणपत्र घेण्यासाठी या कार्यालयांमध्ये येत असतात. अशा वेळी या विभागाच्या विभाग प्रमुखाने किंवा त्यांच्या प्रतिनीधींनी ज्या कुटुंबात विवाह प्रसंग आहे तसेच ज्या कुटुंबामध्ये जन्म किंवा मृत्यु झाला असेल त्या सर्व संबंधित कुटुंबांना, या सुख दु:खाची आठवण म्हणून वृक्षारोपण करण्याबाबत विनंती करून प्रोत्साहित करावे. वृक्षारोपण केलेल्या वृक्षाचे संगोपन व देखभाल तसेच संरक्षण, संवर्धनाद्वारे संबंधित प्रसंग/व्यक्तीच्या आठवणी कायमस्वरूपी जतन करण्याबाबत मार्गदर्शन करावे. अशा कुटुंबांना दि. १ जुलै रोजी फळझाडांची रोपे घेऊन जाण्यास व त्यांची लागवड

करुन संगोपन करण्याबाबतच्या उपरोक्त योजनेची सविस्तर माहिती द्यावी. तसेच त्या अनुषंगाने वृक्ष लागवड व संगोपन याबाबतची पुढील कार्यवाही पार पाडण्याची खबरदारी घेऊन समृध्द पर्यावरण निर्मितीच्या दिशेने काम करण्यात यावे.

२. **रोपांची उपब्धता:-** महानगरपालिका/नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या अधिपत्याखालील उद्यान विभागाने वरील उपक्रम राबविण्यासाठी दरवर्षी किती रोपांची आवश्यकता आहे, याचा वार्डनिहाय अंदाज घ्यावा. त्यानुसार रोप निर्मिती करुन रोपे उपलब्ध करुन द्यावीत. तसेच लोकप्रतिनिधी, उद्योजक, व्यापारी, समाजातील प्रतिष्ठित नागरिक, पर्यावरण प्रेमी व्यक्ती, दानशूर लोक यांच्याकडून देणगी रूपाने तसेच विविध कंपन्याच्या सीएसआर निधीतून वृक्षांची/फळझाडांची रोपे मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच वनमहोत्सव कालावधीत वन, सामाजिक वनीकरण आणि एफडीसीएम (Forest Development Corporation of Maharashtra) यांच्यामार्फत सवलतीच्या दरात उपलब्ध होणाऱ्या रोपांचा लाभ घेता येईल. याशिवाय खासगी रोपवाटिकांमधून देखील रोपांची उपलब्धता होऊ शकेल. महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींनी स्वत:च्या उत्पन्नाच्या स्त्रोतातून यासाठीचा आवश्यक निधी उभारावा. या योजनेंतर्गत वृक्ष लागवड करण्यासाठी आवश्यक रोपे ३० जुन पर्यंत उपलब्ध करून घ्यावीत.

३. **लँड बँक व सूक्ष्म आराखडा:-** महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या क्षेत्रात सर्वेक्षण करून वृक्ष लागवड करण्या योग्य शासकीय तसेच खाजगी जमिनीची सूची "लँड बँक" म्हणून तयार करण्यात यावी. तसेच वृक्ष लागवड करण्याच्या अनुषंगाने कालबद्ध सविस्तर सूक्ष्म आराखडा तयार करण्यात यावा. या कार्यक्रमांतर्गत दिनांक १ जुलै रोजी वृक्ष लागवड करण्यासाठी सुयोग्य माती, आवश्यक खते व कीटकनाशके घालून किमान ३ महिने आधी म्हणजेच ३१ मार्च पर्यंत खड्डे तयार करण्यात यावेत.

४. **रोपांच्या वाटपाचा कालावधी:-** मागील वर्षाचा दि. १ जुलै ते चालू वर्षाचे ३० जून हे वर्ष गृहित धरून जन्म, मृत्यू आणि विवाह या प्रसंगांचे औचित्य साधून किती रोपे वाटावे लागतील, याचा अंदाज वर नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींनी घ्यावा. त्यानुसार दि. १ जुलै रोजी वर्षातून एकदाच रोपांचे वाटप करण्यात यावे.

५. **वृक्षदिंडी, रोपांचे वाटप:-** दिनांक १ जुलै रोजी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे रोपांचे वाटप करण्यापूर्वी उद्यान विभागाकडून वृक्षदिंडी काढण्यात यावी. महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या क्षेत्रातील नागरीक आणि शालेय विद्यार्थी यांना वृक्षदिंडीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी करून घ्यावे. वृक्षदिंडी सभास्थानी आल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात यावे. रोपांचे वाटप करण्यापूर्वी ज्या कुटुंबांना रोपांचे वाटप करावयाचे असेल, त्यांना किमान ४ ते ६ दिवस आधी टोकन दिले जावे. त्यामुळे कार्यक्रमाच्या वेळी कमी वेळात व्यवस्थितरित्या रोपांचे वाटप होऊ शकेल.

६. **वृक्ष लागवडीची नोंद:-** रोपांची वाटप झालेली कुटुंबे जिथे राहत असतील, तेथील गृहनिर्माण सोसायटीच्या परिसरात, स्वत:चे स्वतंत्र घर असल्यास त्या परिसरात, महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या उद्यानातील स्मृती वनात किंवा संबंधित व्यक्ती/ कुटुंबिय त्यांच्या सोयीनुसार उपलब्ध

मोकळया जागांवर दि. १ जुलै ते ७ जुलै या कालावधीत वृक्षारोपण करु शकतील. त्यानंतर लागवड केलेल्या रोपांची माहिती महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या अधिपत्याखालील वार्ड कार्यालये/ उद्यान विभाग यांना कळवावी. अशा वृक्ष लागवडीची योग्य ती नोंद महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींनी वृक्ष नोंदवहीमध्ये विहित प्रपत्रामध्ये (फॉर्म) घ्यावी. या योजनेंतर्गत १ जुलै ते ३१ जुलै, २०१८ दरम्यान प्रत्यक्ष वृक्ष लागवड करण्यात यावी.

७. वृक्ष संवर्धन आढावा:- संगोपन महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत स्तरावर वेळोवेळी विविध विषयांवर बैठकांचे आयोजन करण्यात येत असते. अशा सर्व बैठकांमध्ये वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या विषयाचा समावेश करून, त्याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. तसेच क्षेत्रीय निरीक्षणाच्या वेळी वृक्ष लागवड करण्यात आलेल्या स्थळांना भेटी देऊन वृक्ष संवर्धनाबाबत व उद्दिष्ट्यपूर्ती साठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करावे. वृक्ष लागवड झालेल्या वृक्षांचे योग्य संगोपन होत असल्याची खात्री क्षेत्रीय भेटीच्या वेळी वार्ड अधिकारी/ उद्यान विभागाचे अधिकारी यांनी वेळोवेळी करावी. वृक्ष संगोपनामध्ये काही कमतरता आढळल्यास संबंधित कुटुंब/ व्यक्ती यांना तात्काळ अवगत करावे आणि संबंधित वृक्ष जिवंत राहण्याच्या दृष्टीने योग्य ते मार्गदर्शन करावे.

८. ट्री गार्ड:- सदस्य सचिव आणि अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य बांबू विकास महामंडळ, नागपूर यांनी ट्री गार्डचे मॉडेल तयार केले आहे. तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांनी पर्यावरणपूरक प्लास्टिक ट्री गार्डचे मॉडेल तयार केले आहे. वृक्ष लागवडीनंतर रोपांचे जनावरे व इतर बाबींपासून संरक्षण होण्यासाठी योग्य ट्री गार्डची व्यवस्था करण्यात यावी. तसेच लागवडीनंतर रोपांसाठी पाण्याची व्यवस्था करून त्यांचे जिवंत राहण्याचे प्रमाण किमान ८० ते ९० टक्के राहण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.

९. नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक:- वृक्ष लागवड कार्यक्रमाची विहित मुदतीत प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या स्तरावर नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी. तसेच या कार्यक्रमांतर्गत जिल्हा भरात एकसूत्रता व समन्वय राखण्यासाठी जिल्हा स्तरावर नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करून त्याबाबत शासनास तात्काळ अवगत करण्यात यावे.

१०. महाराष्ट्र हरित सेना-सदस्य नोंदणी:- महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत मधील अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांनी महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून प्राधान्याने नोंदणी करावी. तसेच महाराष्ट्र हरित सेनेच्या सदस्य नोंदणी ची कार्यवाही करताना व्यापक मोहीम राबविण्यात यावी व यामध्ये जास्तीत जास्त नागरिकांना सहभागी करून मोठ्या प्रमाणावर सदस्य नोंदणी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत.

११. अहवाल:- संदर्भाधीन क्रमांक १ व ३ येथील शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार २ कोटी व ४ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत लागवड केलेल्या झाडांच्या जिवंत राहण्याच्या प्रमाणाबाबत संबंधित सदर शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र-२ मधील माहिती प्रधान वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांना तसेच वन विभाग व नगर विकास विभागास पाठविण्यात यावी.

१२. पर्यावरण प्रतिज्ञा:- या योजनेची अंमलबजावणी योग्य दिशेने व्हावी आणि त्यामध्ये लोकसहभाग वाढावा, यासाठी या योजनेसंदर्भात व्यापक प्रचार आणि प्रसिध्दी मोहिम हाती घेण्यात यावी. तसेच शहरी

भागात होणाऱ्या विविध कार्यक्रमांमधून या योजनेची माहिति जनतेला करुन देण्यात यावी. तसेच या मोहिमेंतर्गत पर्यावरण संवर्धन आणि सुरक्षिततेबाबत सामुदायिक प्रतिज्ञेचे आयोजन करण्यात यावे. या प्रसंगी दि. १ जुलै रोजी होणाऱ्या वृक्ष लागवड कार्यक्रमाची सविस्तर माहिती देऊन जास्तीत जास्त नागरिकांना वृक्षारोपणासाठी प्रोत्साहित आणि उद्युक्त करावे.

१३. **सन २०१८ चा वृक्ष लागवड कार्यक्रम:-** मा. मुख्यमंत्री यांचे मान्यतेने ३ वर्षामध्ये ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार वन विभाग व इतर विभाग मिळून अनुक्रमे ७५ टक्के व २५ टक्के या प्रमाणात वृक्षारोपणाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या अंमलबजावणी बाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन क्रमांक १ व ३ येथील शासन परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या आहेत.

प्रत्येक विभाग आणि त्या अंतर्गत मंडळे/महामंडळ यांच्या करिता उद्दिष्टे निश्चित करताना, जिथे वृक्ष लागवडीस अधिक वाव आहे, ती महत्तम क्षमता विचारात घेऊन वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे. त्यानुसार, नगर विकास विभागास सन २०१८ या वर्षासाठी २५ लक्ष वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सन २०१८ या वर्षासाठी महानगरपालिका/नगरपरिषदा/ नगरपंचायती साठी पुढीलप्रमाणे उद्दिष्ट निश्चित करून देण्यात येत आहे.

<u>सन२०१८ या वर्षात नगर विकास विभागामार्फत करावयाच्या वृक्षारोपणाचे उद्दिष्ट.</u>

| अ. क्र. | वृक्षरोपणासाठीची स्थळे | सन - २०१७ | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रति वॉर्ड किमान उद्दिष्ट | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां-निहाय उद्दिष्ट | एकूण |
| १ | महानगरपालिका (एकूण २७) | ६०० | ६०,००० | १६,२०,००० |
| २ | "अ" वर्ग नगरपरिषद (एकूण १८) | ३०० | १०,००० | १,८०,००० |
| ३ | "ब" वर्ग नगरपरिषद (एकूण ७३) | १५० | ४००० | २,९२,००० |
| ४ | "क" वर्ग नगरपरिषद/ नगरपंचायत (एकूण २६७) | १०० | १६०० | ४,२७,२०० |
| ५ | नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालय, पुणे व त्याअंतर्गत प्रत्येक कार्यालयाचा परिसर | - | ३०० | ३०० |
| ६ | शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्या. (प्रत्येकी ६ CIDCO कार्यालये). | - | ३०० | १८०० |
| ७ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण. (कल्याण / ठाणे / वडाळा क्षेत्र.) | - | ३०० | ९०० |
| ८ | पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण व त्या अंतर्गत कार्यालये. | - | ३०० | ९०० |
| ९ | पिंपरी - चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे. | - | ३०० | ३०० |
| १० | नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. | - | ९०० | ९०० |
| | एकूण | | | २५,२४,३०० |

सदर कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व समन्वय या करिता खालील प्रमाणे नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| अ) विभागीय स्तर | : | प्रादेशिक उप संचालक, नगरपरिषद शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय. (सर्व) |
| ब) जिल्हास्तर | : | जिल्हा प्रशासन अधिकारी/जिल्हा प्रकल्प अधिकारी (नपा शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय |
| क) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांस्तर | : | महानगरपालिका-संबंधित अति. आयुक्त/उप आयुक्त नगरपरिषदा/नगरपंचायती-संबंधित मुख्याधिकारी |

उपरोक्त नमूद सर्व कार्यालये व सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर कार्यक्रमांतर्गत वृक्षलागवड करण्यात येणाऱ्या स्थळांची निश्चिती करावी. प्रत्येक स्थळाविषयी सूक्ष्म नियोजन करणे, योग्य रोपांची उपलब्धता, मनुष्यबळाची निश्चिती, वृक्ष लागवडीच्या काळात दरदिवशी होणाऱ्या वृक्षारोपणाचा आराखडा तयार करणे. तसेच, स्थळनिहाय वृक्ष लागवडीसाठी एका जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यात यावी. स्थळ निश्चितीची माहिती प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर, सचिव (वने) आणि या विभागाकडे Geo-tagging या संगणकीय प्रणालीद्वारे अक्षांश-रेखांशासह (Latitude-Longitude) व शक्य तिथे GPS Location सह वेळोवेळी संदर्भाधीन क्रमांक १ व ३ येथील शासन परिपत्रका सोबतच्या विवरणपत्र-१ व २ मध्ये पाठविण्यात यावी. तसेच वृक्ष लागवडी संदर्भात संदर्भाधीन क्रमांक १ व ३ येथील शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या नस्ती क्र. सावनि-२०१७/प्र.क्र.२३४/फ-११ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०३०११७१३४७५०२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2018.03.01 17:13:57 +05'30'

(सुधाकर ज्ञा. बोबडे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव.

२. मा. मुख्यमंत्र्याचे अप्पर मुख्य सचिव.

३. सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, नागपूर.
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (उत्पादन व व्यवस्थापन), व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी, नागपूर.
८. सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक.
९. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, पूणे.
१२.सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक.
१३.सर्व विभागीय आयुक्त.
१४.सर्व जिल्हाधिकारी.
१५.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१६.सर्व आयुक्त, महानगरपालिका
१७.सर्व प्रशासकीय विभागांतर्गत विभाग प्रमुख.
१८.सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक).
१९.सर्व प्रकल्प संचालक व मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव).
२०.सर्व वनसंरक्षक,सामाजिक वनीकरण.
२१.सर्व उप वनसंरक्षक (प्रादेशिक).
२२.सर्व मुख्याधिकारी, अ वर्ग नगरपरिषद.
२३.सर्व विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण.

"वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना" या योजनेंतर्गत ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये वृक्ष लागवडीचा भरीव कार्यक्रम हाती घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०१८/ प्र.क्र.४ /पं.रा.६
बांधकाम भवन, इमारत क्र.२५, मर्झबान पथ फोर्ट,
मुंबई- ४०० ००१
दिनांक:-१६ मार्च, २०१८.

प्रस्तावना :

जागतिक उष्णतापमानात सातत्याने होणारी वाढ, हवामान आणि ऋतू बदल, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष, अतिवृष्टी, पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तींवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वृक्ष लागवडीचा भरीव कार्यक्रम हाती घेणे आवश्यक असल्याची बाब जागतिक स्तरावर मान्य झाली आहे. वृक्षारोपणाचा कार्यक्रम विस्तृतरित्या राबविण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत.वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे लोकचळवळीत रूपांतर होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक, व्यक्ती, कुटूंब यांचा यामधील सहभाग अतिशय महत्वपूर्ण आहे.

या अनुषंगाने मु. पो. रानमळा, ता. खेड (राजगुरूनगर), जि. पुणे या गावातील ग्रामस्थांकडून जन्म, विवाह आणि देवाज्ञा या अविस्मरणीय प्रसंगांच्या निमित्ताने लोकसहभागातून वृक्ष लागवडीचा कार्यक्रम ग्रामपंचायतींच्या माध्यमातून हाती घेतला जातो. वर नमूद प्रसंगांच्या निमित्ताने प्रत्येक कुटूंबातील घराच्या आजूबाजूला, मोकळ्या जागेत, परसबागेत किंवा शेतीच्या बांधावर फळझाडांची रोपे लावून आपल्या प्रिय व्यक्तीची आठवण दीर्घकाळासाठी जपली जाते. अशा उपक्रमातून रानमळा हे गाव हिरवेगार आणि पर्यावरण समृध्द होण्यास मोठा हातभार लागला आहे. त्याचबरोबर कुटुंबाना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन निर्माण झाले आहे. देशातील अनेक लोक हे हिरवेगार गाव पाहण्यासाठी भेटी देतात.

राज्यातील वनक्षेत्र २० टक्केवरून ३३ टक्केपर्यंत नेण्यासाठी **"हरित महाराष्ट्र"** हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्याला हिरवेगार आणि सुरक्षित पर्यावरणाच्या दिशेने नेण्यासाठी रानमळा ग्रामपंचायतीच्या धर्तीवर सर्व ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये वृक्ष लागवडीचा व्यापक कार्यक्रम हाती घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

राज्यातील वनक्षेत्र २० टक्केवरून ३३ टक्केपर्यंत नेण्यासाठी **"हरित महाराष्ट्र"** ह्या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये "वृक्षांची जोपासना हीच निसर्गाची उपासना" ही

योजना लागू करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. सदर योजना ग्रामपंचायतींमार्फत राबविली जाईल. या योजनेंतर्गत वृक्ष लागवडीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) <u>शुभेच्छा वृक्ष</u>:- वर्षभरात गावात जन्माला येणाऱ्या बालकांच्या जन्माचे स्वागत संबंधित कुटूंबाला फळझाडांची रोपे देऊन करण्यात यावे. अशी कुटूंबे त्या झाडांना आपल्या बाळाप्रमाणे जीव लावून त्याचे संवर्धन करतील, असे अपेक्षित आहे.

२) <u>शुभमंगल वृक्ष</u>:- दरवर्षी गावातील ज्या तरूणांचे विवाह होतात, त्यांना फळझाडांची रोपे देऊन शुभाशीर्वाद द्यावेत.

३) आनंदवृक्ष:-दरवर्षी गावातील जे विद्यार्थी दहावी व बारावी परिक्षा उत्तीर्ण होतील,गावातील ज्या तरुण / तरुणींना नोकऱ्या मिळतील आणि गावातील जे उमेदवार विविध निवडणूकांमध्ये विजयी होतील, अशा आनंदाच्या क्षणी त्यांना फळझाडांची रोपे देऊन पुढील वाटचालीसाठी शुभाशीर्वाद द्यावेत.

४) <u>माहेरची झाडी</u>:- गावातील ज्या कन्यांचे विवाह वर्षभरात होतात त्या सासरी गेलेल्या असतात. त्यांना सासरी जावून झाडाचे रोप देणे अवघड असते. म्हणून या विवाहित कन्यांच्या माहेरच्या लोकांनी फळझाडांची रोपे देऊन त्यांना शुभशिर्वाद द्यावेत. आपल्या लेकीप्रमाणेच माया देऊन त्या झाडाची संबंधित कुटुंब संगोपन करतील, असा विश्वास आहे.

५) <u>स्मृती वृक्ष</u>:- एखाद्या गावामध्ये ज्या व्यक्तींचे वर्षभरामध्ये निधन होते, त्या कुटूंबाला फळझाडाचे रोप देऊन श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. सदर कुटुंब झाडाच्या रूपाने आपल्या प्रिय व्यक्तीच्या स्मृतींचे जतन करतील.

<u>रोपांची उपलब्धता</u>:- वरील उपक्रम राबविण्यासाठी समाजातील पर्यावरण प्रेमी व्यक्ती, दानशूर लोक आणि सीएसआर यांच्याकडून देणगी रूपाने फळझाडे मिळवता येतील. तसेच वन, सामाजिक वनीकरण आणि एफडीसीएम यांच्यामार्फत देखील वनमहोत्सव कालावधीत सवलतीच्या दराने रोपांची उपलब्धता करून घेता येईल. याशिवाय खासगी रोपवाटिकांमधून देखील रोपांची उपलब्धता होऊ शकेल. यासाठी आवश्यक असणारा निधी ग्रामपंचायतींनी त्यांच्याकडे उपलब्ध होणाऱ्या उत्पन्नाच्या स्त्रोतातून भागवावा.तसेच ग्रामपंचायतीच्या ग्राम निधीमधून देखील हा खर्च भागविण्यास निधी उपलब्ध करून घेता येईल.

<u>रोपांच्या वाटपाचा कालावधी</u>:- मागील वर्षाचा दि. १ जुलै ते चालू वर्षाचे ३० जून हे वर्ष गृहित धरून जन्म, विवाह आणि देवाज्ञा या प्रसंगांचे औचित्य साधून किती झाडांची रोपे वाटावे लागतील, याचा अंदाज ग्रामपंचायतींनी घ्यावा. त्यानुसार दि. १ जुलै रोजी वर्षातून एकदाच रोपांचे वाटप करण्यात यावे.

वृक्षदिंडी:- वर नमूद केल्याप्रमाणे रोपांचे वाटप करण्यापूर्वी वृक्षदिंडी काढण्यात यावी. ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थी यांना वृक्षदिंडीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी करून घ्यावे.

रोपांचे वाटप व वृक्ष लागवडीची नोंद:- दि. १ जुलै रोजी सभास्थानी वृक्षदिंडी आल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात यावे. रोपांचे वाटप करण्यापूर्वी ज्या कुटुंबात रोपांचे वाटप करावयाचे असेल, त्यांना किमान ४ ते ६ दिवस आधी टोकन दिले जावे. त्यामुळे कमी वेळात व्यवस्थितरित्या रोपांचे वाटप होऊ शकेल. तसेच संबंधित कुटूंबांनी अशी झाडे दि. १ जुलै ते ७ जुलै या कालावधीत लावल्याबाबत योग्य ती नोंद ग्रामपंचायत रजिस्टरमध्ये वृक्ष नोंदवहीमधील फॉर्म क्र. ३३ मध्ये ठेवावी.

पर्यावरण प्रतिज्ञा:- पर्यावरण संवर्धन आणि सुरक्षिततेबाबत सामुदायिक प्रतिज्ञा घेतली जावी.

वर नमूद सुखदु:खाच्या प्रसंगी गावातील ग्रामसेवक / सरपंच यांनी संबंधित कुटुंबियांची भेट घेऊन प्रसंगानुरुप त्यांचे अभिनंदन किंवा सांत्वन करावे.

वरीलप्रमाणे योजना राबवून कुटूंबातील सुख दु:खाची आठवण वृक्षारोपण, संरक्षण, देखभाल व संवर्धनाद्वारे जपणे आणि त्यातून समृध्द पर्यावरण निर्मितीच्या दिशेने काम केले जावे.

हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या (कार्यासन फ-११) सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०३१५१२४८०११४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta
Date: 2018.03.17 11:42:27 +05'30'

( असीम गुप्ता)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.मुख्य सचिव.

२. मा. मुख्यमंत्र्याचे अप्पर मुख्य सचिव.

३. सर्व प्रशासकीय विभागांचे अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

६. सर्व विभागीय आयुक्त.

७. सर्व जिल्हाधिकारी.

८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

९. सर्व आयुक्त, महानगरपालिका

१०.प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित,नागपूर.

११.प्रधान मुख्य वनसंरक्षक, (उत्पादन व व्यवस्थापन), व ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचे नोडल अधिकारी, नागपूर.

१२.सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक.

१३.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

१५.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मुख्यालय), सामाजिक वनीकरण, पूणे.

१६.सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक.

१७.सर्व प्रशासकीय विभागांतर्गत विभाग प्रमुख.

१८. सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक).

१९.सर्व प्रकल्प संचालक व मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव).

२०.सर्व वनसंरक्षक,सामाजिक वनीकरण.

२१.सर्व उप वनसंरक्षक (प्रादेशिक).

२२.सर्व मुख्याधिकारी, अ वर्ग नगरपालिका.

२३. सर्व विभागीय वनाधिकारी, सामाजिक वनीकरण.